# चालू घडामोडी : 1 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर 2024

**By : Sanket Ghorband**
(B.E.CIVIL)
**SANKET SIR'S GS CENTRE**
Telegram Channel : @sanketghorbandsir

## राजकीय व घटनात्मक

### नागरिकत्व कायद्याच्या कलम 6A चे सर्वोच्च न्यायालयाद्वारे समर्थन

- ऑक्टोबर 2024 मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने नागरिकत्व कायदा 1955 च्या कलम 6A च्या घटनात्मकतेचे समर्थन केले. हे कलम आसाममध्ये राहणाऱ्या बांगलादेशातील स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याची परवानगी देते.

### न्यायालयांमध्ये न्यायदेवतेचा नवा पुतळा

- 20 सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांसाठीच्या ग्रंथालयातील न्यायदेवतेचा पुतळा (new statue of Lady Justice) बदलण्यात आला आहे. नवीन गुन्हेगारी संहितेसारख्या कायदेशीर सुधारणांच्या पार्श्वभूमीवर आणि भारताच्या कायदेशीर चौकटीतील वसाहतवादी चिन्हे काढून टाकण्याच्या उद्दिष्टाच्या पार्श्वभूमीवर नवीन पुतळा आणला गेला आहे.
- पुतळ्यामध्ये करण्यात आलेले प्रमुख बदल म्हणजे न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी हटवण्यात आली आहे. तसेच तिच्या एका हातात तराजू तर दुसऱ्या हतात तलवारीऐवजी भारतीय संविधान दिसत आहे.
- दिल्लीतील कला महाविद्यालयात शिकवणारे म्युरलिस्ट विनोद गोस्वामी यांनी हा पुतळा तयार केला आहे.

#### नव्या मूर्तीची वैशिष्ट्ये:

- न्यायदेवतेची नवी मूर्ती पांढऱ्या शुभ्र रंगाची आहे.
- ही मूर्ती भारतीय वेशभूषेत आहे. साडी, डोक्यावर मुकूट, कपाळावर टिकली, कानात व गळ्यात पारंपरिक आभूषणे दिसत आहेत.

#### जुन्या मूर्तीची वैशिष्ट्ये:

- भारतातील न्यायदेवतेच्या जुन्या मूर्तीची प्रेरणा ग्रीक आणि रोमन पौराणिक कथांमधून घेण्यात आली होती. तिथल्या संस्कृतीत थेमिस ही न्यायाची देवता आहे. तिच्या एका हातात तराजू तर, दुसऱ्या हातात तलवार आहे. अनेक न्यायालयांमध्ये भारतीय व ग्रीक तत्त्वज्ञानानाचे मिश्रण करून तयार केलेली न्यायदेवतेची मूर्ती पाहायला मिळते.
- आधी न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पट्टी होती. ही पट्टी म्हणजे समानतेचे प्रतीक मानले जात होती. याचाच अर्थ न्यायालयासमोर सर्वजण सारखेच आहेत. नेता, सेलिब्रेटी, श्रीमंत, गरीब असा भेदभाव न्यायदेवता करत नाही. तर हातातील तलवार ही गुन्हेगारांना शिक्षा देण्याची शक्ती दर्शवत होती.

### कर्मयोगी मिशन अंतर्गत राष्ट्रीय शिक्षण सप्ताह

- मिशन कर्मयोगी उपक्रमांतर्गत नागरी सेवा क्षमता बांधणीत एक नवीन अध्याय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण सप्ताहाचे (National Learning Week) उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 19 ऑक्टोबर 2024 रोजी केले.
- नागरी सेवकांना सतत शिकण्याची आणि क्षमता निर्माण करण्याची संस्कृती स्वीकारण्यासाठी प्रवृत्त करणे आणि सक्षम करणे आणि राष्ट्रीय सेवा उद्दिष्टे पुन्हा साकार करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करणे हा कर्मयोगी सप्ताह उपक्रमाचा उद्देश आहे.

### भारताचे 51 वे सरन्यायाधीश म्हणून संजीव खन्ना यांचा शपथविधी

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 11 नोव्हेंबर 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांना भारताच्या सरन्यायाधीश (Chief Justice of India: CJI) पदाची शपथ दिली.
- त्यांनी 51वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांची जागा घेतली. त्यांना 11 नोव्हेंबर 2024 ते 13 मे 2025 पर्यंत जवळपास 6 महिन्यांचा कार्यकाळ लाभणार आहे.

#### सरन्यायाधीश संजीव खन्ना :

- जन्म: 14 मे 1960 रोजी. त्यांचे वडील देवराज खन्ना हे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते तर काका हंसराज खन्ना सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होते. त्यांच्या आई सरोज खन्ना या दिल्लीच्या प्रतिष्ठित लेडी श्रीराम महाविद्यालयात हिंदीच्या व्याख्यात्या होत्या.
- 1983 मध्ये खन्ना यांना दिल्ली बार कौन्सिलची सनद मिळाली. दिल्लीच्या तीसहजारी संकुलातील जिल्हा न्यायालयात त्यांनी

वकिली करायला सुरुवात केली. त्यानंतर दिल्ली उच्च न्यायालय आणि न्यायाधिकरणांमध्ये त्यांनी घटनात्मक कायदा, प्रत्यक्ष कर आकारणी, लवाद कार्यवाही अशा विविध क्षेत्रांमध्ये कारकीर्द घडवली.

- 2005 साली त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम करण्यास सुरुवात केल्यानंतर ते 2006 साली न्यायमूर्ती म्हणून कायम झाले.
- 18 जानेवारी 2019 रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून निवड झाली.
- न्या. संजीव खन्ना हे सध्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे (National Legal Services Authority) पॅट्रॉन-इन-चीफ आहेत.

### 'बुलडोझर कारवाइ' बाबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

- एखादी व्यक्ती गुन्ह्यातील आरोपी आहे म्हणून त्या व्यक्तीच्या मालमत्तेवर बुलडोझरने पाडकाम करणे हे घटनाविरोधी असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर 2024 मध्ये दिला. अशी कारवाई घटनाविरोधी ठरवतानाच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्याला त्यासाठी दोषी धरले जावे, असेही न्यायालयाने यावेळी नमूद केले.

### नागरी नोंदणी प्रणाली (CRS) मोबाईल ॲप्लिकेशन :

- नोव्हेंबर 2024 मध्ये, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रशासनासह तंत्रज्ञानाचे एकत्रिकरण करण्यासाठी नागरी नोंदणी प्रणाली (Civil Registration System: CRS) मोबाईल ॲप्लिकेशनचे अनावरण केले.
- भारतात दशकीय जनगणना आयोजित करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या रजिस्ट्रार जनरल अँड सेन्सस कमिशनर ऑफ इंडिया (RGCCI) द्वारे हे ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे.
- हे ॲप्लिकेशन अर्ज जन्म आणि मृत्यूसाठी नोंदणी प्रक्रिया सुव्यवस्थित करेल, नागरिकांना या महत्त्वपूर्ण घटनांची कधीही, कोठूनही आणि त्यांच्या राज्याच्या अधिकृत भाषेत नोंदणी करण्याची परवानगी देऊन त्रासमुक्त अनुभव सुनिश्चित करेल.

### तमिळगा वेत्री कळघम (TVK) पक्षाची स्थापना:

- तामिळनाडूतील विजय (सी जोसेफ विजय) या लोकप्रिय अभिनेत्याने ऑक्टोबर 2024 मध्ये विलूपुरी जिल्ह्यातील विक्रवंडी येथे विशाल सभेद्वारे तमिळगा वेत्री कळघम (Tamilaga Vettri Kazhagam TVK) पक्षाच्या स्थापनेची घोषणा केली. 1970 च्या दशकात एम. जी. रामचंद्रन (एमजीआर) हे तमिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी आरूढ झाले होते. विजय यांचे चाहते एमजीआर यांच्याशी त्यांची तुलना करत आहेत. 2026 मध्ये तामिळनाडू विधानसभा निवडणुका आहेत.

### मध्य प्रदेशमध्ये राज्य सेवांमध्ये महिलांसाठी 35% नोकरी आरक्षण:

- मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या अध्यक्षतेखालील मध्य प्रदेश मंत्रिमंडळाने सर्व राज्य सरकारी भरतींमध्ये महिलांसाठी 35 टक्के आरक्षणाला नोव्हेंबर 2024 मध्ये मंजुरी दिली.

## पुरस्कार व पुस्तके

### समांथा हार्वे यांच्या 'ऑर्बिटल'ला बुकर पारितोषिक 2024

- ब्रिटीश लेखिका समांथा हार्वे (Samantha Harvey) यांच्या 'ऑर्बिटल' (Orbital) कादंबरीला 2024 सालचे बुकर पारितोषिक नोव्हेंबर 2024 मध्ये मिळाले. पुरस्काराची रक्कम 50 हजार पौंड इतकी आहे.
- 'ऑर्बिटल' ही बुकर जिंकणारी अवकाश क्षेत्रावर आधारित पहिलीच कादंबरी आहे.
- बुकर पारितोषिकाच्या इतिहासातील ही दुसरी सर्वात लहान (136 पृष्ठे) कादंबरी आहे. पेनेलोप फिट्झगेराल्ड यांची 'ऑफशोअर'(Offshore) ही सर्वात लहान (132 पृष्ठे) कादंबरी आहे.
- आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील सहा अंतराळवीर आणि त्यांचा एक दिवसाचा प्रवास या कथेवर आधारित असलेली 'ऑर्बिटल' ही कादंबरी यंदा ब्रिटनमधील सर्वोच्च खपाचे पुस्तक ठरले आहे.
- 2024 च्या बुकर पारितोषिकासाठी पहिल्यांदाच सहा नामांकितांपैकी पाच महिला होत्या.

### बुकर पारितोषिक :

- हा इंग्रजी भाषेत लिहिलेल्या आणि युनायटेड किंगडम व आयर्लंडमध्ये प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट कादंबरीसाठी दरवर्षी दिला जाणारा साहित्यिक पुरस्कार आहे.
- स्थापना 1969
- पूर्वी या पुरस्काराला बुकर प्राइज फॉर फिक्शन (1969-2001) आणि मॅन बुकर प्राइज (2002-2019 ) असे संबोधण्यात येत होते.
- पूर्वी केवळ राष्ट्रकुल, आयरिश आणि दक्षिण आफ्रिकन (आणि नंतर झिम्बाब्वे) नागरिकांनी लिहिलेल्या कादंबऱ्याच पारितोषिकासाठी पात्र होत्या. 2014 मध्ये हे पारितोषिक जगातील सर्व लेखक/लेखिकांसाठी खुले करण्यात आले.

- बुकर पारितोषिक विजेत्याला 50,000 पौंड मिळतात, इतर शॉर्टलिस्टेड लेखकांना प्रत्येकी 2,500 पौंड दिले जातात.
- या पारितोषिकाला 2019 पासून क्रँकस्टार्टचे (Crankstart) समर्थन आहे.

**इंटरनॅशनल बुकर पारितोषिक :**

- इंग्रजीमध्ये अनुवादित केलेल्या आणि युनायटेड किंगडम किंवा आयर्लंडमध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकासाठी हा पुरस्कार दिला जातो.
- 50,000 पौंड बक्षीस रक्कम विजेत्या कादंबरीच्या लेखक आणि अनुवादकामध्ये समान रीतीने विभागली जाते.
- **2024 चे विजेते :** Kairos – जर्मनीच्या जेनी एरपेनबेक (मूळ लेखिका) आणि मायकेल हॉफमन (अनुवादक)

### मारिया कोरिना मचाडो आणि एडमंडो गोन्झालेझ उरुतिया यांना 2024 चे सखारोव्ह पारितोषिक

- युरोपियन संसदेने व्हेनेझुएलामधील लोकशाहीवादी नेत्या मारिया कोरिना मचाडो आणि राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार एडमंडो गोन्झालेझ उरुतिया यांना विचार स्वातंत्र्यासाठीचे संखारोव्ह पारितोषिक 2024 (Sakharov Prize for the Freedom of Thought) प्रदान करण्यात आले.
- **विजेत्यांविषयी :** व्हेनेझुएलाचे विद्यमान अध्यक्ष निकोलस मादुरो यांनी 2024 च्या निवडणुकांमध्ये फेरफार करत सत्ता हाती घेतली. त्यानंतर राजकीय दडपशाहीच्या भीतीने मचाडो या भूमिगत झाल्या. सप्टेंबर 2024 मध्ये, व्हेनेझुएलाच्या न्यायालयाने गोन्झालेझ यांच्यासाठी अटक वॉरंट जारी केले त्यामुळे त्यांनी देशाबाहेर पडत स्पेनचा आश्रय घेतला.

**विचार स्वातंत्र्यासाठीचे सखारोव्ह पारितोषिक (Sakharov Prize for Freedom of Thought):**

- मानवाधिकार, लोकशाही आणि मूलभूत स्वातंत्र्यांचे रक्षण करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान आणि समर्थन करण्यासाठी युरोपियन संसद दरवर्षी सखारोव्ह पारितोषिक प्रदान करते.
- स्वरूप : 50,000 युरो
- 1988 मध्ये सुरू करण्यात आलेला हा पुरस्कार सोव्हिएत आण्विक भौतिकशास्त्रज्ञ आणि लोकशाही आणि मानवी हक्कांचे मजबूत रक्षक आंद्रेई सखारोव्ह यांच्या नावावर आहे. आण्विक शस्त्रास्त्रांच्या शर्यतीच्या धोक्यांविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांसाठी त्यांना 1975 चा नोबेल शांतता पुरस्कार मिळाला होता.
- 2023 चे विजेते: जिना महसा अमिनी आणि इराणमधील जान, जिंदगी, आझादी चळवळ

### पंतप्रधान मोदींना नायजेरियाचा द्वितीय सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार

- नायजेरियाने 17 नोव्हेंबर, 2024 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर हा आपला द्वितीय-सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला.
- हा सन्मान प्राप्त करणारे पंतप्रधान मोदी हे द्वितीय परदेशी मान्यवर ठरले आहेत. यापूर्वी हा पुरस्कार एलिझाबेथ यांना 1969 मध्ये मिळाला होता.

### पंतप्रधान मोदींना तीन विदेशी पुरस्कार

- पंतप्रधान मोदींना नोव्हेंबर 2024 मध्ये तीन देशांच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.
- **डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर:** कॉमनवेल्थ ऑफ डॉमिनिकाच्या अध्यक्षांनी 20 नोव्हेंबर 2024 रोजी त्यांचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रदान केला.
- **गयानाचा ऑर्डर ऑफ एक्सलन्स:** गयाना देशाने त्यांचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार पंतप्रधान मोदींना प्रदान केला. पंतप्रधान मोदी हे गयानाच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित होणारे केवळ चौथे परदेशी नेते आहेत.
- **बार्बाडोसचा ऑनररी ऑर्डर ऑफ फ्रीडम ऑफ बार्बाडोस :** बार्बाडोसनेही त्यांचा प्रतिष्ठित पुरस्कार पंतप्रधान मोदींना प्रदान केला.

### पुरस्कार व पुस्तके (At a Glance)

- **राष्ट्रपती मुर्मू यांना अल्जेरियात मानद डॉक्टरेट प्रदान:** ऑक्टोबर 2024 मध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अल्जेरिया, मॉरिटानिया आणि मलावी या तीन देशांच्या दौऱ्यावर असताना अल्जियर्समधील सिदी अब्देल्लाह सायन्स अँड टेक्नॉलॉजी पोल युनिव्हर्सिटीकडून त्यांना राज्यशास्त्रातील मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. या तीन आफ्रिकन राष्ट्रांचा भारतीय राष्ट्रपतींनी केलेला हा पहिलाच दौरा होता.
- **अभिनेता दारासिंग खुराणा यांना यूकेमध्ये महात्मा गांधी लीडरशिप अवॉर्ड:** भारतीय अभिनेता आणि परोपकारी व्यक्ती दारासिंग खुराना यांना मानसिक आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, विशेषतः 'राष्ट्रकुल युवा वर्ष चॅम्पियन' म्हणून त्यांनी केलेल्या प्रभावी कार्याबद्दल प्रतिष्ठित महात्मा गांधी लीडरशिप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- **एसबीआयला भारतातील सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार:** स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ला ग्लोबल फायनान्स मॅगझिनने 2024 साठी भारतातील सर्वोत्कृष्ट बँक म्हणून वॉशिंग्टन येथे आयोजित केलेल्या 31 व्या वार्षिक सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारांमध्ये सन्मानित केले.

- **बिभाब तालुकदार यांना IUCN चा हॅरी मेसेल कॉन्झर्व्हेशन लीडरशिप अवॉर्ड :** आसाममधील संवर्धन शास्त्रज्ञ बिभब कुमार तालुकदार यांना अबुधाबी येथील इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर (IUCN) च्या प्रजाती सर्व्हायव्हल कमिशन (SSC) द्वारे संरक्षण नेतृत्वासाठी प्रतिष्ठित हॅरी मेसेल पुरस्काराने ऑक्टोबर 2024 मध्ये सन्मानित करण्यात आले.
- **शक्तीकांत दास यांना सेंट्रल बँक रिपोर्ट कार्ड 2024 मध्ये A+:** भारतीय रिझर्व्ह बँकेचे (RBI) गव्हर्नर शक्तीकांत दास यांना सलग दुसऱ्या वर्षी-सेंट्रल बँक रिपोर्ट कार्ड्स 2024 मध्ये A+ ग्रेड देण्यात आला. ऑक्टोबर 2024 मध्ये वॉशिंग्टन डी. सी. येथील एका कार्यक्रमादरम्यान ग्लोबल फायनान्सने त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.
- **श्री. श्री. रविशंकर यांना फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार :** फिजी प्रजासत्ताकने 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे आध्यात्मिक गुरू श्री. श्री. रविशंकर यांना ऑनररी ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी हा सर्वोच्च नागरी पुरस्कार ऑक्टोबर 2024 मध्ये प्रदान केला.
- **ब्रॅट कॉलिन्स डिक्शनरीचा 2024 सालचा वर्ड ऑफ द इयर:** कॉलिन्स डिक्शनरीने 2024 साठी वर्ड ऑफ द इयर (Word of the Year) म्हणून बॅट (brat) शब्दाची घोषणा नोव्हेंबर 2024 मध्ये केली. आत्मविश्वासी, स्वतंत्र आणि सुखी वृत्ती. मूलतः गैरवर्तन करणाऱ्या मुलाचे वर्णन करण्यासाठी हा शब्द वापरला जातो.
- **Friends - India's Closest Strategic Partners :** प्रो. श्रीराम चौलिया यांचे फ्रेंड्स इंडियाज क्लोजेस्ट स्ट्रॅटेजिक पार्टनर्स हे नवीनतम पुस्तक भारताच्या परराष्ट्र संबंधांच्या गुंतागुंतीच्या जगात डोकावते, भारताच्या सर्वात जवळचे मित्र आणि धोरणात्मक भागीदारांबद्दल एक अद्वितीय दृष्टीकोन देते.
- **Speaking with Nature: The Origins of Indian Environmentalism:** नोव्हेंबर 2024 मध्ये प्रसिद्ध लेखक रामचंद्र गुहा यांचे Speaking with Nature: The Origins of Indian Environmentalism नामक पुस्तकाचे प्रकाशन झाले.
- **अनिल प्रधान यांना रोहिणी नय्यर पुरस्कार:** ओडिशातील 28 वर्षीय सामाजिक कार्यकर्ते अनिल प्रधान यांना ग्रामीण विकासातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल तिसरा रोहिणी नय्यर पुरस्कार नोव्हेंबर 2024 मध्ये प्रदान करण्यात आला.
- **सोनू सूदची थायलंडसाठी ब्रँड ॲम्बेसेडर आणि मानद पर्यटन सल्लागार म्हणून नियुक्ती:** प्रसिद्ध अभिनेता आणि परोपकारी व्यक्ती सोनू सूद यांची थायलंडसाठी ब्रँड ॲम्बेसेडर आणि मानद पर्यटन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सोनू सूद आणि थायलंडचे पर्यटन आणि क्रीडा मंत्रालय यांच्यातील हे सहकार्य थायलंडला भारतातील पर्यटन स्थळ म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.
- **फिलिप नॉयस यांना सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार:**
  - ज्येष्ठ ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नॉयस यांना 55 व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFI) प्रतिष्ठित सत्यजित रे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.
  - क्लिअर अँड प्रेझेंट डेंजर, सॉल्ट आणि रॅबिट-प्रूफ फेंस यांसारख्या चित्रपटांसाठी ते प्रसिद्ध आहेत.



# क्रीडा

## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून प्रमुख खेळांना वगळण्याचा निर्णय

- स्कॉटलंडमध्ये 23 जुलै ते 2 ऑगस्ट 2026 दरम्यान आयोजित केल्या जाणाऱ्या ग्लासगो राष्ट्रकुल 2026 क्रीडा स्पर्धेतून काही प्रमुख खेळांना वगळून टाकण्याचा निर्णय राष्ट्रकुल क्रीडा महासंघाकडून घेण्यात आला.
- राष्ट्रकुल क्रीडा महासंघ या स्पर्धेत किती आणि कोणत्या खेळांचा समावेश करायचा याचा निर्णय किंवा याबाबतचे अधिकार यजमान देशाला देतो. मात्र, असा निर्णय घेताना ॲथलेटिक्स (पॅरा ॲथलेटिक्ससह) आणि जलतरण (पॅरा जलतरणसह) हे दोन खेळ अनिवार्य असल्याचे राष्ट्रकुल क्रीडा महासंघाने स्पष्ट केले आहे.
- **वगळण्यात आलेले क्रीडा प्रकार:** हॉकी, क्रिकेट, बॅडमिंटन, कुस्ती, टेबल टेनिस, डायव्हिंग, रग्बी सेव्हन्स, बीच व्हॉलीबॉल, माउंटन बाइकिंग, स्कॅश आणि तालबद्ध (rhythmic) जिम्नॅस्टिक्स.
- **खेळवले जाणारे 10 क्रीडा प्रकार:** ॲथलेटिक्स (ट्रॅक आणि फील्ड), जलतरण, 3x3 बास्केटबॉल, ट्रॅक सायकलिंग, वेटलिफ्टिंग, लॉन बॉल, कलात्मक (artistic) जिम्नॅस्टिक्स, नेटबॉल, बॉक्सिंग आणि ज्युडो

### राष्ट्रकुल स्पर्धा (Commonwealth Games) :

- कॉमनवेल्थ ऑफ नेशन्समधील क्रीडापटूंसाठीची ही चार वर्षांनी आयोजित केली जाणारी आंतरराष्ट्रीय बहुक्रीडा स्पर्धा आहे.
- राष्ट्रकुल क्रीडा महासंघ (CGF) या स्पर्धांचे आयोजन करतो.
- कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स हा 56 देशांचा समूह आहे ज्यात बहुतेक पूर्वीच्या ब्रिटिश वसाहती आहेत.
- 1949 मध्ये लंडन जाहीरनाम्याद्वारे याची स्थापना करण्यात आली.

## बॅलोन डी'ओर पुरस्कार 2024

- ऑक्टोबर 2024 मध्ये, स्पॅनिश फुटबॉलपटू रॉड्रि (Rodri) आणि ऐताना बोनमाटी (Aitana Bonmat) यांनी अनुक्रमे सर्वोत्कृष्ट पुरुष आणि महिला फुटबॉलपटूंसाठीचा बॅलोन डी'ओर पुरस्कार 2024 जिंकला.
- मँचेस्टर सिटी क्लबच्या रॉड्रिने प्रथमच हा पुरस्कार जिंकला असून, सर्वोत्कृष्ट पुरुष फुटबॉलपटूचा पुरस्कार जिंकणारा तो 1960 नंतरचा पहिला स्पॅनिश खेळाडू ठरला आहे.
- बार्सिलोना क्लबच्या ऐताना बोनमाटीने 2023 मध्येही सर्वोत्कृष्ट महिला फुटबॉलपटूचा हा पुरस्कार जिंकला होता.

## एबी डिव्हिलियर्स, लिस्टर कुक आणि नीतू डेव्हिड यांचा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये

- दक्षिण आफ्रिकेचा एबी डिव्हिलियर्स, इंग्लंडचा लिस्टर कुक आणि भारतीय महिला क्रिकेटपटू नीतू डेव्हिड या तीन क्रिकेटपटूंचा समावेश ICC हॉल ऑफ फेममध्ये करत असल्याची घोषणा इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिल (ICC) ने ऑक्टोबर 2024 मध्ये केली.

### नीतू डेव्हिड :

- त्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या डावखुऱ्या फिरकीपटू होत्या.
- त्या वन-डे आंतरराष्ट्रीय (ODI) मध्ये 100 बळी घेणाऱ्या पहिल्या भारतीय महिला क्रिकेटपटू ठरल्या होत्या.
- 2005 मध्ये ICC महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत विकेट घेण्याच्या यादीत त्यांनी अव्वल स्थान पटकावले होते.

## महिला हॉकीपटू राणी रामपालची निवृत्ती

- भारतीय महिला हॉकी संघाची माजी कर्णधार राणी रामपालने जवळपास 16 वर्षांच्या कारकिर्दीनंतर ऑक्टोबर 2024 मध्ये अधिकृतपणे आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा केली. भारत-जर्मनी पुरुषांच्या द्विपक्षीय मालिकेनंतर नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद स्टेडियमवर झालेल्या समारंभात रामपालने निवृत्ती घेतली.
- हॉकी इंडियाने तिच्या सन्मानार्थ तिची आयकॉनिक नंबर 28 जर्सी निवृत्त केली.
- हरियाणातून येणाऱ्या राणीने 254 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि 205 गोल केले.
- वयाच्या अवघ्या 15 व्या वर्षी तिने अर्जेंटिना येथे 2010 मध्ये झालेल्या 12व्या महिला हॉकी विश्वचषकात भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तिला 'यंग प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्कार मिळाला होता.
- 2018 मध्ये राणीची भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली.

## क्रीडा (At a Glance)

- **2036 च्या ऑलिम्पिकच्या यजमानपदासाठी भारताची बोली:** भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन (IOA) ने आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) कडे 2036 ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्याची इच्छा व्यक्त करत औपचारिक हेतू पत्र नोव्हेंबर 2024 मध्ये सादर केले.

➢ **सर्वात कमी चेंडूंमध्ये 300 कसोटी बळी घेण्याचा कागिसो रबाडाचा विक्रम :** दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने केवळ 11,817 चेंडूंमध्ये 300 कसोटी बळी घेत सर्वात कमी चेंडूंमध्ये 300 बळी घेण्याचा विक्रम केला आहे. वकार युनूस (12,602 चेंडू) आणि डेल स्टेन (12,605 चेंडू) यांसारख्या दिग्गजांना त्याने मागे टाकले आहे.

➢ **झिम्बाब्वेचा सर्वाधिक T20I धावांचा विक्रम:**
- झिम्बाब्वेच्या क्रिकेट संघाने सिकंदर रझाच्या केवळ 43 चेंडूतील नाबाद 133 धावांच्या बळावर टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात 4 बाद 344 अशी विक्रमी धावसंख्या नोंदवली. गॅम्बिया विरोधातील सामन्यात झिम्बाब्वेने हा विक्रम केला.
- 2023 मध्ये नेपाळने मंगोलियाविरुद्ध केलेल्या 3 बाद 314 च्या आधीच्या सर्वोच्च धावसंख्येला झिम्बाब्वेने मागे टाकले.

➢ **भारतीय फुटबॉल संघ फिफा क्रमवारीत 125व्या स्थानावर:** भारतीय पुरुष फुटबॉल संघाने FIFA क्रमवारीत माफक प्रगती करत ऑक्टोबर 2024 मध्ये प्रसिद्ध झालेल्या क्रमवारीत 125 वे स्थान मिळवले.

➢ **शारापोव्हा, ब्रायन ब्रदर्स 2025 टेनिस हॉल ऑफ फेम क्लासमध्ये समाविष्ट:** रशियाची मारिया शारापोव्हा आणि अमेरिकेचे जुळे बंधू बॉब आणि माईक ब्रायन यांना 2025 च्या आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेमच्या क्लासमध्ये समाविष्ट करण्यात आले.

➢ **आर. अश्विनला ICC वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील सर्वाधिक बळी :**
- ऑक्टोबर 2024 मध्ये पुण्यात झालेल्या न्यूझीलंड विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात नेत्रदीपक कामगिरी करताना, रविचंद्रन अश्विनने ICC वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) मध्ये सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनण्याचा विक्रम केला. त्याने 189 WTC विकेट्ससह ऑस्ट्रेलियन फिरकीपटू नॅथन लियॉनला मागे टाकले.
- ICC वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) 2019 मध्ये सुरू करण्यात आली होती.

➢ **U23 जागतिक कुस्ती स्पर्धा 2024 :** ऑक्टोबर 2024 मध्ये तिराना, अल्बेनिया येथे आयोजित U23 जागतिक कुस्ती चॅम्पियनशिप 2024 मध्ये भारतीय कुस्तीपटूंनी 1 सुवर्ण, 1 रौप्य आणि 7 कांस्य पदकांसह एकूण 9 पदके जिंकली.

➢ **अंडर-19 वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिप:** कोलोरॅडो, यूएसए येथे वर्ल्ड बॉक्सिंगद्वारे आयोजित पहिल्याच अंडर 19 वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाने एकूण 17 पदके मिळवून प्रभावी कामगिरी केली.

➢ **अनिश सरकार जगातील सर्वात युवा रेट केलेला बुद्धिबळपटू:** भारतातील कोलकाता येथील अनिश सरकार हा 3 वर्षांचा मुलगा नोव्हेंबर 2024 मध्ये जगातील सर्वात तरुण-रेट केलेला बुद्धिबळपटू (world's youngest-rated chess player) बनला. वयाची 3 वर्षे, 8 महिने आणि 19 दिवसांचा असताना त्याने ही कामगिरी केली. त्यावेळी अनिशचे FIDE रेटिंग 1555 होते आणि जागतिक रँक 1,46,736 होती.

➢ **FIH हॉकी स्टार पुरस्कार 2024:** भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि माजी गोलकीपर पीआर श्रीजेश यांना मस्कत, ओमान येथे आयोजित FIH हॉकी स्टार पुरस्कार 2024 समारंभात अनुक्रमे वर्षातील सर्वोत्तम हॉकीपटू आणि वर्षातील सर्वोत्तम गोलरक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले.

➢ **तय्यब इकराम यांची पुन्हा FIH अध्यक्षपदी निवड :** नोव्हेंबर 2024 मध्ये तय्यब इकराम यांची सलग दुसऱ्यांदा आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशन (FIH) च्या अध्यक्षपदी निवड झाली. ते पाकिस्तानचे आहेत.

➢ **एच एस सोधी यांचे निधन :** भारतीय पोलोमधील प्रसिद्ध खेळाडू हरिंदर सिंग सोधी यांचे नोव्हेंबर 2024 मध्ये वयाच्या 86 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ते 'बिली' म्हणून ओळखले जात होते.

➢ **पंकज अडवाणी ठरला वर्ल्ड बिलियर्ड्स चॅम्पियन 2024:** अनुभवी भारतीय क्युईस्ट पंकज अडवाणीने विक्रमी 28 वे जागतिक विजेतेपद मिळवून पुन्हा एकदा या खेळातील आपले प्रभुत्व दाखवले आहे. 9 नोव्हेंबर 2024 रोजी दोहा येथे झालेल्या IBSF वर्ल्ड बिलियर्ड्स चॅम्पियनशिपमध्ये त्याने इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलवर विजय मिळवला आणि सलग सातवी वर्ल्ड बिलियर्ड्स चॅम्पियनशिप स्पर्धा जिंकली.

➢ **टीम साऊथी क्रिकेटला अलविदा करणार:** न्यूझीलंडचा सर्वकालीन आघाडीचा विकेट घेणारा गोलंदाज टीम साऊथी याने सध्याची ICC वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप मोहीम पूर्ण झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय नोव्हेंबर 2024 मध्ये जाहीर केला.

➢ **'नो युवर मेडिसिन' ॲपचे अनावरण:** केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री, डॉ. मनसुख मांडविया यांनी क्रीडा क्षेत्रातील डोपिंग विरुद्धच्या लढ्याला बळकट करण्यासाठी नोव्हेंबर 2024 मध्ये 'नो युवर मेडिसिन (KYM)' ॲपचे अनावरण केले. राष्ट्रीय उत्तेजक विरोधी एजन्सी (NADA) ने विकसित केलेले हे ॲप क्रीडापटू, प्रशिक्षक आणि संपूर्ण क्रीडा समुदायाने वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### के. संजय मूर्ती

- भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 148 अन्वये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारताचे कॅग म्हणजेच नियंत्रक व महालेखानिरीक्षक (Comptroller and Auditor General of India: CAG) म्हणून के. संजय मूर्ती यांची 18 नोव्हेंबर 2024 रोजी नियुक्ती केली.
- त्यांना 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे (जे आधी घडेल त्यानुसार) पर्यंत कार्यकाळ लाभेल
- ते स्वतंत्र भारताचे 15 वे कॅग ठरले आहेत. त्यांनी आधीचे कॅग गिरीशचंद्र मुर्मू यांची जागा घेतली आहे.
- के. संजय मूर्ती हे कॅग पदावर नियुक्त होणारे पहिले तेलुगू व्यक्ती ठरले आहेत.
- **जीवनपरिचय:**
  - मूर्ती हे मूळचे आंध्र प्रदेशातील डॉ. बी. आर. आंबेडकर कोनसीमा जिल्ह्यातील आहेत.
  - मेकॅनिकल इंजिनीअरिंगची पदवी घेतल्यानंतर त्यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. ते 1989 बॅचचे हिमाचल प्रदेश केडरचे आयएएस अधिकारी आहेत.

## जागतिक

### भारताद्वारे कॅनडाच्या राजनैतिक अधिकाऱ्यांची हकालपट्टी

- जून 2023 मध्ये कॅनडाच्या ब्रिटिश कोलंबियातील गुरुद्वाराबाहेर झालेल्या खलिस्तानी फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमध्ये भारताचा सहभाग असल्याचा आरोप कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांनी सप्टेंबर 2023 मध्ये केला होता. त्यानंतर ऑक्टोबर 2024 मध्ये कॅनडाने भारतीय उच्चायुक्त संजय वर्मा यांच्यासह इतर राजनैतिक अधिकारी या हत्येमागे सहभागी असल्याचा आरोप केल्यानंतर भारताने संजय वर्मा यांच्यासह आपल्या राजनैतिक अधिकाऱ्यांना परत बोलावले आणि कॅनडाच्या महा राजनैतिक अधिकाऱ्यांना भारताबाहेर काढले.

### 16 वी ब्रिक्स शिखर परिषद

- 22-24 ऑक्टोबर 2024 दरम्यान रशियातील कझान (Kazan) येथे 16 वी ब्रिक्स (BRICS) शिखर परिषद आयोजित करण्यात आली. भारतातर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी या परिषदेला हजर होते.

**भारत-चीन द्विपक्षीय चर्चा :**

- 'ब्रिक्स परिषदे'च्या पार्श्वभूमीवर तब्बल पाच वर्षांनी दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा झाली. यापूर्वी ऑक्टोबर 2019मध्ये ममलापूरम येथे दोघांमध्ये संवाद झाला होता.
- सीमेवरील शांतता आणि स्थैर्याला दोन्ही देशांचे प्राधान्य असावे आणि विश्वास हा द्विपक्षीय संबंधांचा आधार असावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांना केले.

**16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेची प्रमुख वैशिष्ट्ये:**

- नवीन सदस्यांचा सहभाग: जानेवारी 2024 मध्ये, ब्रिक्स गटाने इजिप्त, इथिओपिया, इराण आणि युएई हे चार नवीन सदस्य जोडले होते. या देशांचे नेते शिखर परिषदेला हजर होते. सौदी अरेबियाने अद्याप ब्रिक्स तथापि सदस्यत्वाची औपचारिकता जाहीर केलेली नाही, त्यांचे परराष्ट्र मंत्री शिखर परिषदेला उपस्थित होते.
- बहुपक्षीयता बळकट करणे, दहशतवादाचा सामना करणे, आर्थिक विकासाला चालना देणे, शाश्वत विकासाचा पाठपुरावा करणे आणि ग्लोबल साउथच्या चिंतेचे निराकरण करणे यावर परिषदेमध्ये चर्चा झाली.

**कझान घोषणापत्र:**

- संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे शांततापूर्ण निराकरणासाठी युक्रेनबाबत मध्यस्थी करण्यावर या घोषणापत्रात भर देण्यात आला.
- **ब्रिक्स ग्रेन एक्स्चेंज:** ब्रिक्स अंतर्गत धान्य ट्रेडिंग प्लॅटफॉर्मच्या स्थापनेवर चर्चा झाली. त्याला ब्रिक्स ग्रेन एक्सचेंज म्हणून ओळखले जाईल.
- **आर्थिक एकात्मता समर्थन:** शिखर परिषदेने सदस्य देशांमधील अधिक आर्थिक एकात्मतेच्या गरजेवर भर दिला. स्थानिक चलनांमध्ये व्यापाराचे महत्त्व, सुरळीत क्रॉस बॉर्डर पेमेंटची सुविधा, भारताचे यशस्वी UPI मॉडेल आणि SWIFT ला टक्कर देण्यासाठी BRICS- नेतृत्वाखालील पेमेंट सिस्टम या गोष्टींवर भर देण्यात आला.
- **बिग कॅट्स:** दुर्मिळ प्रजाती, विशेषतः मोठ्या मांजरींचे जतन करण्यासाठी सदस्य देशांच्या प्रयत्नांना पाठिंबा दिला आणि आंतरराष्ट्रीय बिग कॅट्स अलायन्स तयार करण्याच्या भारताच्या पुढाकाराची नोंद घेतली.

**ब्रिक्स (BRICS):**

- ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या जगातील आघाडीच्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा हा एक गट आहे.
- 2001 मध्ये, ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ जिम ओफ्नील यांनी ब्राझील,

रशिया, भारत आणि चीन या चार उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचे वर्णन करण्यासाठी ब्रिक (BRIC) हा शब्द तयार केला.

- 2006 मध्ये झालेल्या ब्रिक परराष्ट्र मंत्र्यांच्या पहिल्या बैठकीत या गटाला औपचारिकता देण्यात आली. होती.
- डिसेंबर 2010 मध्ये दक्षिण आफ्रिका ब्रिक मध्ये सामील झाला. त्यानंतर गटाचे नामांतर ब्रिक्स (BRICS) असे झाले.
- 1 जानेवारी 2024 पासून इजिप्त, इराण, संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि इथिओपिया हे चार देश ब्रिक्समध्ये सदस्य म्हणून समाविष्ट झाले. सौदी अरेबियाने अद्याप (नोव्हेंबर 2024 अखेरपर्यंत) ब्रिक्स सदस्यत्वाची औपचारिकता जाहीर केलेली नाही, तर अर्जेन्टिना देशाने सदस्यत्व नाकारले.

**ब्रिक्सचे उपक्रम:**

- **नवीन विकास बँक (New Development Bank):**
  - 2014 मध्ये फोर्टालेझा (ब्राझील) येथे सहाव्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान, नेत्यांनी नवीन विकास बँक स्थापन करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. 2015 मध्ये हा करार अंमलात आला.
  - मुख्यालय: शांघाय, चीन
  - संस्थापक सदस्य: ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका
  - नवीन सदस्य: बांगलादेश (सप्टेंबर 2021), युएई (ऑक्टोबर 2021) आणि इजिप्त (फेब्रुवारी 2023)
  - संभाव्य सदस्य: उरुग्वे
  - पहिले अध्यक्ष: के. व्ही. कामत
  - सध्याच्या आणि पहिल्या महिला अध्यक्षः ब्राझीलच्या डिल्मा रौसेफ

## श्री कर्तारपूर साहिब कॉरिडॉर कराराचे नूतनीकरण

- ऑक्टोबर 2024 मध्ये भारत आणि पाकिस्तानने श्री कर्तारपूर साहिब कॉरिडॉर करार (Sri Kartarpur Sahib Corridor agreement) 2029 पर्यंत वाढवला. यामुळे भारतीय यात्रेकरूंना पाकिस्तानमधील श्री कर्तारपूर साहिब गुरुद्वाराला आणखी पाच वर्षे व्हिसा मुक्त प्रवेश मिळवता येईल.
- कर्तारपूर साहिब कॉरिडॉर करारावर 24 ऑक्टोबर 2019 रोजी दोन्ही देशांद्वारे स्वाक्षरी करण्यात आली होती. हा करार पाच वर्षांच्या कालावधीसाठी वैध होता. आता तो आणखी पाच वर्षांसाठी वैध राहील.

**कर्तारपूर कॉरिडॉर :**

- तो पाकिस्तानमधील नारोवाल जिल्ह्यातील दरबार साहिब कर्तारपूर गुरुद्वाराला भारताच्या पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील डेरा बाबा नानक गुरुद्वाराशी जोडतो.
- कर्तारपूर कॉरिडॉरमुळे भारतीय यात्रेकरूंना पाकिस्तानमधील दरबार साहिब कर्तारपूर गुरुद्वारापर्यंत व्हिसा मुक्त प्रवेश मिळतो. भारतीय यात्रेकरूंना पाकिस्तानात जाण्यासाठी फक्त परवानगीची गरज असते.

## तैपेई आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र (TECC)

- तैवान सरकारने मुंबईत तैपेई आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र (Taipei Economic and Cultural Centre: TECC) उघडल्यामुळे चीनने भारताकडे तीव्र राजनैतिक निषेध नोंदवला.
- मुंबईतील TECC हे तैवान सरकारचे नवी दिल्ली (1995) आणि चेन्नई (2012) नंतरचे भारतातील तिसरे कार्यालय आहे.
- 1993 मध्ये, भारत आणि तैवानने एकमेकांच्या देशात प्रतिनिधी कार्यालये स्थापन केली. ती म्हणजे तैपेईमध्ये इंडिया- तैपेई असोसिएशन आणि नवी दिल्लीत TECC.
- अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि रशिया सारखे इतर देश देखील व्हिसा सेवा आणि सांस्कृतिक-आर्थिक देवाणघेवाण करण्यासाठी अशा केंद्रांची देखभाल करतात.

## तुर्कीयेचा इराक, सीरियावर 'सर्जिकल स्ट्राइक'

- तुर्कियेची राजधानी अंकारामध्ये विमान उत्पादन क्षेत्रातील अग्रणी कंपनी 'तुसास' किंवा तुर्की एरोस्पेस डस्ट्रीजच्या (TUSAS) कारखान्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला कुर्द फुटीरतावादी जबाबदार असल्याचा आरोप करत तुर्कियेने ऑक्टोबर 2024 मध्ये इराक आणि सीरियाच्या हद्दीत हवाई सर्जिकल स्ट्राईक / कारवाई केली.
- या हवाई हल्ल्यात तुर्कीयेने इराक आणि सीरियामधील तुर्कीयेच्या सीमेला लागून असलेल्या प्रदेशातील कुर्द दहशतवाद्यांचे किमान 30 तळ उद्धस्त केल्याचा दावा करण्यात आला. मात्र सीरियामध्ये तुर्कीच्या हल्ल्यांमुळे दहा लाख लोकांचा पाणी पुरवठा बंद झाल्याची बातमी समोर आली आहे.
- तुर्कियेमधील हल्ला 'कुर्दिस्तान वर्कर्स पार्टी' (पीकेके) या दहशतवादी संघटनेने केल्याचा आरोप तुर्किये सरकारने केला होता.

## भारत ARIN-AP सुकाणू समितीत सामील

- ऑक्टोबर 2024 मध्ये, भारताचा 'मालमत्ता पुनर्प्राप्ती इंटरएजन्सी नेटवर्क एशिया पॅसिफिक' (Asset Recovery Interagency Network-Asia Pacific: ARIN-AP) च्या सुकाणू समितीमध्ये समावेश करण्यात आला.
- भारताचे सक्तवसुली संचालनालय (Enforcement Directorate: ED) या समितीत भारताचे प्रतिनिधित्व करेल.
- भारत 2026 मध्ये ARIN-AP चे अध्यक्षपद स्वीकारेल आणि नेटवर्कच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे (AGM) आयोजन करेल.

**Asset Recovery Interagency Network- Asia Pacific (ARIN-AP):**

- हे आशिया-पॅसिफिक प्रदेशातील व्यक्ती, कंपन्या आणि मालमत्तेवरील माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी एक बहु-एजन्सी नेटवर्क आहे जे बेकायदेशीर क्रियाकलापांच्या कमाईचा पाठपुरावा आणि पुनर्प्राप्ती सुलभ करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आले आहे.

**ब्राझीलचा बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हला (BRI) नकार**

- चीनशी मजबूत आर्थिक संबंध असूनही, ब्राझीलने चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (BRI) मध्ये सामील न होण्याचा निर्णय नोव्हेंबर 2024 मध्ये घेतला. असा निर्णय घेणारे ते भारतानंतरचे द्वितीय ब्रिक्स (BRICS) राष्ट्र बनले आहे.
- **बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (BRI):** आशियाला आफ्रिका आणि युरोपशी जमीन आणि सागरी नेटवर्कद्वारे जोडणे, प्रादेशिक एकात्मता सुधारणे, व्यापार वाढवणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे या उद्देशाने सप्टेंबर 2013 मध्ये सुरु करण्यात आलेला BRI हा चीनचा धोरणात्मक उपक्रम आहे.

**जपानची सार्वत्रिक निवडणूक**

- जपानमध्ये 27 ऑक्टोबर 2024 रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल धक्कादायक लागले. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्या सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (LDP) पक्षाने बहुमत गमावले.
- मात्र लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (LDP) आणि कोमेटो (Komeito) पक्षाने अल्पसंख्यांक सरकार स्थापन केले असून 11 नोव्हेंबर 2024 रोजी शिगेरू इशिबा यांची डाएटमध्ये पुन्हा पंतप्रधानपदी निवड झाली.

**भारताची अखेर तालिबानशी चर्चा**

- परराष्ट्र खात्याचे सहसचिव जे. पी. सिंह यांनी 6 नोव्हेंबर 2024 रोजी काबूलला भेट दिली. या भेटीत त्यांनी तालिबान राजवटीचा संरक्षणमंत्री मोहम्मद याकूब मोहाजिद आणि परराष्ट्रमंत्री आमिर खान मुत्ताकी यांची भेट घेतली. ऑगस्ट 2021 नंतर तालिबान राजवटीबरोबर थेट चर्चा केल्याची कबुली भारतातर्फे पहिल्यांदाच देण्यात आली.

**डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष**

- नोव्हेंबर 2024 मध्ये अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाचे निवडणूक निकाल समोर आले. रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प (Donald Trump) हे डेमोक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांचा पराभव करत अमेरिकेचे 47 वे राष्ट्राध्यक्ष बनले.
- डोनाल्ड ट्रम्प यांनी 270 चा बहुमताचा आकडा पार करत हा विजय मिळवला. डोनाल्ड ट्रम्प यांना 312 इलेक्टोरल मते मिळाली आहेत. त्याचवेळी कमला हॅरिस यांना केवळ 226 इलेक्टोरल मते मिळाली.
- 130 वर्षांहून अधिक काळात राष्ट्राध्यक्ष पदावर परतणारे ते पहिले माजी राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. तसेच वयाच्या 78 व्या वर्षी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आलेले ते सर्वात वयस्कर व्यक्ती ठरले आहेत.
- यापूर्वी ट्रम्प यांनी जानेवारी 2017 ते 2021 या कालावधीत 45 वे राष्ट्राध्यक्ष म्हणून काम केले होते.

**उपराष्ट्राध्यक्षपदी जेडी वान्स:**

- डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह त्यांचे उपराष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार जेडी वान्स (JD Vance) देखील उपराष्ट्राध्यक्षपदी निवडून आले आहेत.
- जेम्स डेव्हिड व्हॅन्स हे रिपब्लिकन पक्षाचे राजकारणी, वकील, लेखक आणि मरीन कॉर्प्सचे माजी सदस्य आहेत.
- त्यांच्या पत्नी उषा चिलुकुरी वान्स या भारतीय मूळ असलेल्या अमेरिकन आहेत.

**समोसा कॉकस :**

- अमेरिकेच्या काँग्रेसमधील भारतीय वंशाच्या प्रतिनिधींच्या गटाला 'समोसा कॉकस' असे संबोधले जाते.
- 2024 मध्ये झालेल्या कनिष्ठ सभागृहासाठीच्या निवडणुकीत भारतीय वंशाच्या सात सदस्यांची संख्या वाढली असल्याने पुन्हा एकदा समोसा कॉकसची चर्चा आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांच्याविषयी:**

- डोनाल्ड ट्रम्प यांचा जन्म 14 जून 1946 रोजी न्यूयॉर्क शहरात झाला.
- रिअल इस्टेट उद्योजक फ्रेंड ट्रम्प यांचे ते पुत्र आहेत. पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातील व्हार्टन स्कूलमधून त्यांनी अर्थशास्त्रात पदवी घेतली आहे.
- 1973 साली आपल्या वडिलांचा उद्योग हातात घेऊन त्यांनी तो वाढवला. सध्या ते जगातील सर्वाधिक श्रीमंत अशा व्यक्तींमध्ये गणले जातात.
- उद्योग जगताशी निगडित अनेक पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत. त्यांचे पहिले पुस्तक द आर्ट ऑफ द डील हे व्यवसाय क्लासिक मानले जाते.
- ते रिपब्लिकन पक्षाचे नेते आहेत. ट्रम्प यांनी जानेवारी 2017 ते 2021 या कालावधीत 45 वे राष्ट्राध्यक्ष म्हणून काम केले होते. ते आता 47 वे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडूनही आले आहेत.
- त्यांचा स्वतःचा 'ट्रुथ सोशल' (Truth Social) नामक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म देखील आहे.

## कायद्याचे राज्य निर्देशांक 2023 मध्ये भारत 79 वा

- World Justice Project (WJP) ने ऑक्टोबर 2024 मध्ये प्रसिद्ध केलेल्या कायद्याचे राज्य निर्देशांक 2023 (Rule of Law Index 2023) नुसार 142 देशांमध्ये भारत 79 व्या क्रमांकावर आहे.
- या निर्देशांकानुसार 2022 ते 2023 दरम्यान कायद्याचे राज्य कमकुवत झालेल्या देशात 6 अब्जाहून अधिक लोक राहतात.
- निर्देशांकामध्ये प्रत्येक देशाचे गुण सरासरी आठ घटकांवर ठरतात: सरकारी शक्तींवरील बंधने, भ्रष्टाचाराची अनुपस्थिती, खुले सरकार, मूलभूत अधिकार, ऑर्डर आणि सुरक्षा, नियामक अंमलबजावणी, नागरी न्याय आणि फौजदारी न्याय.

**अव्वल देश:**

1) डेन्मार्क
2) नॉर्वे
3) फिनलंड
4) स्वीडन
5) जर्मनी

**तळातील देश:**

142) व्हेनेझुएला
141) कंबोडिया
140) अफगाणिस्तान
139) हैती
138) डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो

## हेन्ली पासपोर्ट इंडेक्स 2024

- ऑक्टोबर 2024 मध्ये प्रसिद्ध झालेल्या नवीनतम हेन्ली पासपोर्ट इंडेक्सनुसार, सिंगापूर जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्ट ठरला आहे. सिंगापूर पासपोर्ट धारकाला 195 देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश मिळतो.
- भारत या निर्देशांकानुसार 83 व्या स्थानावर आहे. भारताच्या पासपोर्टधारकांना 58 देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश मिळतो.
- फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान आणि स्पेन हे संयुक्तपणे द्वितीय स्थानावर असून या देशांच्या पासपोर्टधारकांना 192 देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश मिळतो.
- यूएस 186 देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेशासह 8 व्या स्थानावर आहे.
- अफगाणिस्तान, सीरिया, इराक, येमेन, सोमालिया आणि पाकिस्तान हे देश क्रमवारीनुसार तळाशी आहेत.

## जागतिक (At a Glance)

- **मलावी आणि मॉरिटानियाला राष्ट्रपतींची भेट:** ऑक्टोबर 2024 मध्ये भारताच्या राष्ट्रपतींनी मलावी (Malawi) आणि मॉरिटानियाला (Mauritania) भेट दिली. मलावी आणि मॉरिटानियाला भारतीय राष्ट्रपतींची ही पहिलीच भेट आहे.
- **'वर्किंग हॉलिडे मेकर व्हिसा' सुरू करण्याची ऑस्ट्रेलियाची घोषणा:**
  - ऑस्ट्रेलियन सहायक इमिग्रेशन मंत्री मॅट थिस्लेथवेट यांनी ऑक्टोबर 2024 मधील त्यांच्या नवी दिल्ली भेटीदरम्यान 'वर्किंग हॉलिडे मेकर व्हिसा' सुरू करण्याची घोषणा केली.
  - वर्किंग हॉलिडे मेकर व्हिसाच्या अंतर्गत भारतातील तरुण एक वर्षासाठी ऑस्ट्रेलियाला भेट देऊ शकतात आणि सुटीच्या वेळी काम करू शकतात किंवा अभ्यास करू शकतात. प्रत्येक वर्षात या धोरणांतर्गत ऑस्ट्रेलिया 18 ते 30 वयोगटातील 1,000 पात्र भारतीय नागरिकांना फर्स्ट वर्क आणि हॉलिडे व्हिसा देऊ करणार आहेत.
- **याह्या सिनवारची हत्या :** हमास गटाच्या लष्करी आघाडीचा प्रमुख आणि दहशतवादी नेता याह्या सिनवार याची इस्रायलने हत्या झाल्याचे 17 ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आले. इस्मायल हनिये या हमासच्या राजकीय नेत्याच्या हत्येनंतर सिनवारच हमासची सूत्रे चालवत होता. ऑस्ट्रेलियात 10 वर्षांच्या मुलांना तुरुंगवासाची शिक्षाः ऑस्ट्रेलियाच्या नॉर्दर्न टेरिटरी (एनटी) मधील संसदेने गुन्हेगार व्यक्तींचे वय 10 वर्षांपर्यंत कमी करणारे वादग्रस्त कायदे मंजूर केले आहेत. वाढती तरुण गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचे एनटी सरकारचे म्हणणे आहे. या निर्णयावर मानवाधिकार संघटना, डॉक्टर, स्थानिक गट आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांकडून तीव्र टीका केली जात आहे.
- **'क्रिंक' (CRINK) युती :** चीन (C), रशिया (R), इराण (I), उत्तर कोरिया (NK) या देशांच्या अनौपचारिक एकत्रित युतीसाठी 'क्रिंक' हा शब्द वापरला जातो. युक्रेनला वश करण्यासाठी नाटो देशांच्या विरोधातील हे चारही देश अनौपचारिकपणे एकत्र आले आहेत. या देशांमधील साहचर्य नाटोला इंडो-पॅसिफिक झोन मधील समविचारी देशांशी घनिष्ठ संबंध निर्माण करण्यास भाग पाडते आहे.
- **पहिली आशियाई बौद्ध शिखर परिषद:**
  - भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघ (IBC) च्या सहकार्याने 5-6 नोव्हेंबर 2024 रोजी नवी दिल्ली येथे पहिली आशियाई बौद्ध शिखर परिषद (Asian Buddhist Summit : ABS) आयोजित केली. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या प्रमुख पाहुणे म्हणून परिषदेला उपस्थित राहिल्या.
  - आशियाच्या बळकटीकरणात बुद्ध धम्माची भूमिका (Role of Buddha Dhamma in Strengthening Asia) ही या शिखर परिषदेची संकल्पना होती.

- **राखीनमध्ये तीव्र दुष्काळाची परिस्थिती :** रोहिंग्या अल्पसंख्याकांचे निवासस्थान असलेले म्यानमारचा राखीन राज्य (Rakhine state) हे अंतर्गत संघर्ष, आर्थिक आकुंचन आणि नैसर्गिक आपत्तींच्या संयोजनामुळे तीव्र दुष्काळाच्या उंबरठ्यावर असल्याची चेतावणी युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) ने दिली आहे.
- **अफगाणिस्तानातील महिलांना एकमेकींचा आवाज ऐकण्यावर बंदी :** तालिबान सरकारच्या एका मंत्र्यानुसार, आता नवीन फतव्यानुसार अफगाण महिलांना मोठ्याने कुराण पठण करण्यास किंवा इतर महिलांसमोर कुराण पठण करण्यास मनाई आहे तसेच प्रौढ महिलांना एकमेकांचा आवाज ऐकू देण्यास मनाई आहे. 2021 मध्ये तालिबानने अफगाणिस्तानमध्ये आपली सत्ता स्थापन केल्यानंतर 'सद्गुणाचा प्रचार आणि दुर्गुण रोखण्यासाठी'मंत्रालयाची स्थापना केली.
- **4B चळवळ :** 'मीटू' चळवळीच्या अनुषंगाने 2017 व 2018 मध्ये दक्षिण कोरियातील स्त्रियांनी 4B चळवळीची सुरुवात केली होती. ही एक निषेध चळवळ आहे. त्याद्वारे स्त्रियांना पुरुषांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले जाते. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत ट्रम्प यांच्या विजयाने निराश झाल्यामुळे अमेरिकेतील महिलांनी आपली निराशा जाहीर करण्यासाठी 4B चळवळीचा मार्ग अवलंबला आहे.
- **'चीफ ऑफ स्टाफ' पदी सूसी विल्स :** अमेरिकेत रिपब्लिकन पक्षाचे नेते डोनाल्ड ट्रम्प हे राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या प्रचार व्यवस्थापक सूसी विल्स यांना व्हाईट हाऊसच्या चीफ ऑफ स्टाफ म्हणून नियुक्त केले आहे. अमेरिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच 'चीफ ऑफ स्टाफ' पदी महिला ऑफिसरची नियुक्ती झाली आहे.
- **ऑस्ट्रेलियात 16 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींना सोशल मीडिया वापरास बंदी:** ऑस्ट्रेलिया सरकारने 7 नोव्हेंबर 2024 रोजी देशातील 16 वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमाच्या वापरावर बंदी घालण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. यासाठी कायदा केला जाणार आहे. या निर्णयाच्या कठोर अंमलबजावणीस त्या-त्या माध्यम वा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला जबाबदार धरण्यात येणार आहे.
- **ऑस्ट्रेलियाची MATES योजना :**
  - ऑस्ट्रेलियाची 'मोबिलिटी अरेंजमेंट फॉर अल- प्रोफेशनल स्कीम' (MATES) ही योजना भारतीय विद्यापीठातील पदवीधरांना आणि करिअरच्या सुरुवातीच्या काळात व्यावसायिकांना ऑस्ट्रेलियामध्ये दोन वर्षे काम करण्याची संधी प्रदान करते. ही योजना या वर्षी डिसेंबरपासून व्यावसायिकांसाठी खुली होईल
  - MATES ची स्थापना MMPA अंतर्गत करण्यात आली आहे. 23 मे 2023 रोजी ऑस्ट्रेलिया आणि भारताने मायग्रेशन अँण्ड मोबिलिटी पार्टनरशिप अरेंजमेंटला (MMPA) सुरुवात केली. MMPA ही द्विपक्षीय फ्रेमवर्क योजना आहे; जी दोन्ही देशांतील बेकायदा आणि अनियमित स्थलांतराशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी तयार करण्यात आली आहे.
- **न्यूझीलंडमध्ये महिला खासदाराचा 'वॉर डान्स' :** नोव्हेंबर 2024 मध्ये न्यूझीलंडच्या संसदेत तरुण महिला खासदार हाना-राविती मायपी-क्लार्क आणि त्यांच्या माओरी आदिवासी समुदायातील खासदारांनी एका विधेयकाच्या विरोधात त्यांचा विरोध व्यक्त करण्यासाठी संसदेत पारंपरिक हाका नृत्य सादर केले.
- **सार्वभौम संपत्ती निधीमध्ये अबू धाबीने जगातील सर्वात श्रीमंत शहर:** Global SWF नुसार ऑक्टोबर 2024 पर्यंत, सार्वभौम संपत्ती निधीद्वारे व्यवस्थापित भांडवलाबाबत अबू धाबी जागतिक स्तरावर सर्वात श्रीमंत शहर ठरले आहे.
- **ई-माइग्रेट पोर्टलच्या द्वितीय आवृत्तीच अनावरण :** ई-माइग्रेट पोर्टल भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने (MEA) 2014 मध्ये विकसित केले होते. हे पोर्टल एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे जे भारतीय कामगारांना, विशेषतः ब्लू-कॉलर कामगारांना सुरक्षितपणे आणि कायदेशीररित्या स्थलांतरित होण्यास मदत करते.
- **रियाधमध्ये 'प्रवासी परिचय 2024':** सौदी अरेबियातील भारताचे राजदूत डॉ. सुहेल अजाझ खान यांच्या हस्ते रियाध येथील दूतावास सभागृहात 'प्रवासी परिचय 2024' चे उद्घाटन करण्यात आले. सौदी अरेबियातील भारतीय डायस्पोरा असोसिएशन आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या डायस्पोरा एंगेजमेंट डिव्हिजनच्या भागीदारीत भारतीय दूतावासाने 2023 मध्ये सुरू केलेला प्रवासी परिचय हा एक महत्त्वाचा सांस्कृतिक उत्सव बनला आहे.
- **सॉल्ट टायफून :** सॉल्ट टायफून (Salt Typhoon) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिनी हॅकिंग गटाने कथितरित्या आयोजित केलेल्या सायबर हेरगिरी ऑपरेशनमध्ये माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, त्यांचे रनिंग मेट जेडी व्हान्स आणि उपाध्यक्ष कमला हॅरिस यांच्या मोहिमेतील कर्मचाऱ्यांसह विविध डेमोक्रॅटिक व्यक्तींच्या फोन डेटाला लक्ष्य केले.
- **शेख नईम कासेम हिजबुल्लाचा नवीन प्रमुख :** सप्टेंबर 2024 मध्ये इस्रायलकडून झालेल्या हसन नसराल्लाह यांच्या हत्येनंतर हिजबुल्लाह गटाने नवीन सरचिटणीस म्हणून शेख नइम कासिम यांची नियुक्ती जाहीर केली. हिजबुल्लाह हा लेबनीज शिया अर्धसैनिक आणि राजकीय गट आहे.

➢ **डॉ. जॅकलिन डी'अरोस ह्युजेस यांची जागतिक कृषी मंचाच्या महासचिवपदी नियुक्ती:** International Crops Research Institute for the Semi-Arid Tropics (ICRISAT) या संस्थेच्या महासंचालक राहिलेल्या डॉ. जॅकलिन डी'अरोस ह्यूजेस यांची जागतिक कृषी मंच (World Agriculture Forum: WAF) च्या महासंचालकपदी नोव्हेंबर 2024 मध्ये नियुक्ती झाली. त्या मूळच्या ब्रिटीश आहेत.

➢ **आशिष खन्ना ISA चे नवे महासंचालक :**

- नोव्हेंबर 2024 मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) च्या सातव्या अधिवेशनात भारत आणि फ्रान्सची अनुक्रमे ISA चे अध्यक्ष आणि सह-अध्यक्ष म्हणून पुन्हा निवड झाली. ही निवड 2024 2026 या कालावधीसाठी आहे.
- आपल्या 7 व्या अधिवेशनात, ISA ने तिसरे महासंचालक म्हणून भारताचे आशिष खन्ना यांची निवड केली. मार्च 2025 मध्ये कार्यकाळ संपणारे सध्याचे महासंचालक अजय माथूर यांचे स्थान खन्ना घेतील.
- 2030 पर्यंत सौर क्षेत्रात USD 1 ट्रिलियन गुंतवणुक आणणे आणि सौर तंत्रज्ञानाची किंमत कमी करणे हे ISA चे उद्दिष्ट आहे.

➢ **स्वित्झर्लंडचा बुरखा बंदी कायदा 2025 मध्ये लागू होणार:** स्वित्झर्लंड 1 जानेवारी 2025 पासून बुरखा बंदी लागू करण्यासाठी सज्ज आहे. स्वित्झर्लंडमध्ये 2021 मध्ये सार्वमतामध्ये या बुरखा बंदीला मंजुरी देण्यात आली होती.

➢ **बेंगळुरूमध्ये बनणार बिमस्टेक ऊर्जा केंद्र :** परराष्ट्र मंत्रालयाने कर्नाटकातील बेंगळुरू येथे बिमस्टेक ऊर्जा केंद्र (BIMSTEC Energy Centre) स्थापन करण्यासाठी करारावर स्वाक्षरी केल्याची घोषणा नोव्हेंबर 2024 मध्ये केली.

➢ **नवीन रामगुलाम यांची चौथ्यांदा मॉरिशसच्या पंतप्रधानपदी नियुक्ती :** मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष पृथ्वीराजसिंग रूपून यांनी नवीन रामगुलाम यांची नवीन पंतप्रधान म्हणून नोव्हेंबर 2024 मध्ये नियुक्ती केली. 77 वर्षीय नवीन रामगुलाम यांची ही चौथी टर्म असेल.

➢ **लंडन सलग दुसऱ्या वर्षी जगातील टॉप सिटी ब्रँड :**

- ब्रँड फायनान्सच्या ग्लोबल सिटी इंडेक्सनुसार, लंडनने सलग दुसऱ्या वर्षी जगातील टॉप 100 सिटी ब्रँड च्या यादीत अव्वल स्थान पटकावले.
- लंडन नंतर न्यूयॉर्क, पॅरिस, टोकियो, दुबई, सिंगापूर, लॉस एंजेलिस, सिडनी, सॅन फ्रान्सिस्को, आम्सटरडॅम यांचा क्रमांक लागतो.

➢ **ऑस्ट्रेलियामध्ये प्रथमच गुलामगिरी विरोधी आयुक्त नियुक्ती:** ऑस्ट्रेलियाने आपले पहिले गुलामगिरी विरोधी आयुक्त ख्रिस इव्हान्स यांची नियुक्ती नोव्हेंबर 2024 मध्ये केली. ते डिसेंबर 2024 पासून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील. आधुनिक गुलामगिरीचा सामना करण्यासाठी सरकार, व्यवसाय आणि समाजातील प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी या पदाची रचना करण्यात आली आहे. आधुनिक गुलामगिरीमध्ये मानवी तस्करी, सक्तीचे श्रम आणि फसव्या भरतीचा समावेश आहे.

➢ **पेरूमधील चाँके मेगापोर्टचे चीनतर्फे अनावरण :** पेरू देशातील चाँके (Chancay) येथे चीनने 1.3 अब्ज डॉलर्स खर्चून बांधलेल्या मेगापोर्टचे अनावरण नोव्हेंबर 2024 मध्ये करण्यात आले. हा मेगापोर्ट चीनी शिपिंग कंपनी कॉस्कोच्या मालकीचा असून दक्षिण अमेरिकाला आशियाशी जोडण्याचे आणि प्रादेशिक व्यापाराला चालना देण्याचे वचन देतो.

## बिबेक देबरॉय

➢ ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व पंतप्रधानांचे माजी आर्थिक सल्लागार बिबेक देबरॉय यांचे नोव्हेंबर 2024 मध्ये नवी दिल्ली येथे निधन झाले. ते 69 वर्षांचे होते.

➢ 25 जानेवरी 1955 रोजी बिबेक देबरॉय यांचा जन्म मेघालयमधील शिलांग येथे बंगाली कुटुंबात झाला. त्यांचे आजी अजोबा बांगलादेशातून भारतात आले होते.

➢ त्यांचे वडील भारत सरकारच्या इंडियन ऑडिट एंड अकाउंट्स सर्व्हिसमध्ये होते.



**सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील वृक्षतोड रोखण्यासाठी 'टास्क फोर्स' समिती स्थापन**

- संपूर्ण दोडामार्ग तालुका व सावंतवाडीतील एकूण 12 गावांमध्ये वृक्षतोडीस बंदी घालण्यात आली आहे. त्यानुसार अवैधरित्या होणाऱ्या वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सावंतवाडी-दोडामार्ग टास्क फोर्स समिती स्थापन करण्यात आली आहे.

**पोलीस महासंचालक रश्मी शुक्लांची निवडणूक आयोगाकडून बदली**

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अवघ्या 15 दिवस आधी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली. केंद्रीय निवडणूक आयोगाने यासंदर्भातले आदेश जारी केले. पदरचनेतील शुक्ला यांच्या नंतरच्या सर्वात वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे पोलीस महासंचालकपदाचा कार्यभार सोपवण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले.

**महाराष्ट्रात महायुतीचा विजय**

- 20 नोव्हेंबर 2024 रोजी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल 23 नोव्हेंबर 2024 रोजी जाहीर झाला. सर्व राजकीय विश्लेषक, मतदानोत्तर चाचण्यांचे अंदाज चुकीचे ठरवत महायुतीने 288 पैकी तब्बल 235 जागांवर विजय मिळवला. तर, महाविकास आघाडीने केवळ 50 जागा जिंकल्या.
- विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या 29 जागादेखील (एकूण सदस्यांच्या 10 टक्के) आघाडीतील एकही पक्ष मिळवू शकला नाही.
- **नांदेडमध्ये पोटनिवडणूक:** नांदेड जिल्ह्यात विधानसभेबरोबरच लोकसभेची पोटनिवडणूक झाली. काँग्रेसचे खासदार वसंत चव्हाण यांचे ऑगस्ट महिन्यात निधन झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर काँग्रेसचे उमेदवार रवींद्र चव्हाण निवडून आले.

**पक्षनिहाय आकडेवारी (पक्ष : विजयी आमदार : मतांची टक्केवारी) :**

- भारतीय जनता पार्टी: 132 (26.77%)
- शिवसेना: 57 (12.38% )
- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार): 41 (9.01%)
- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे): 20 (9.96%)
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस : 16 (12.42%)
- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) : 10 (11.28%)
- समाजवादी पक्ष : 2 (0.38%)
- जन सुराज्य शक्ती : 2
- राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्ष: 1
- राष्ट्रीय समाज पक्ष: 1
- ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन : 1 (0.85%)
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी): 1
- भारतीय शेतकरी आणि कामगार पक्ष: 1
- राजर्षी शाहू विकास आघाडी: 1
- अपक्ष 2 (शरद सोनावणे - जुन्नर; शिवाजी पाटील - चंदगड)
- महाराष्ट्र नवनिर्माण सेना: 0 ( 1.55%)
- नोटा (NOTA): 0.72%

**21 महिला आमदार :**

- महाराष्ट्राच्या 288 जागांच्या विधानसभेच्या निवडणुकीत एकूण 21 महिला उमेदवार विजयी झाल्या आहेत, ज्यामध्ये विरोधी पक्षाकडून फक्त एक महिला आमदार (काँग्रेसच्या ज्योती गायकवाड (धारावी)) आहेत.
- सर्वाधिक महिला आमदार (14) भाजपच्या आहेत.
- **सर्वात तरुण आमदार :** रोहित पाटील (वय: 25 वर्षे) (तासगाव मतदारसंघ) (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार)
- **सर्वात ज्येष्ठ आमदार :** छगन भुजबळ (वय: 77 वर्षे) (येवला मतदारसंघ) (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
- **सर्वाधिक मताधिक्याने विजय :** काशिराम पावरा (भाजप) (शिरपूर मतदारसंघ) (159044 मतांनी विजयी)
- **सर्वात कमी मताधिक्याने विजय :** मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (AIMIM) (मालेगाव मध्य मतदारसंघ) (162 मतांनी विजयी)

**मतदान टक्केवारी:**

- 2024 च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात सरासरी 66.05% मतदान झाले. 1995 नंतरचे हे सर्वाधिक मतदान ठरले. 1995 मध्ये 71.69% मतदान झाले होते.
- राज्यात सर्वाधिक 84.96% मतदान कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर मतदारसंघात झाले.
- सर्वात कमी 44.44% मतदान हे कुलाबा मतदारसंघात झाले.
- राज्यात सर्वाधिक 76.25% मतदान हे कोल्हापूर जिल्ह्यात झाले. सर्वात कमी 52.07% मतदान हे मुंबई शहर जिल्ह्यात झाले.

**व्ही. कमलाकर राव**

- जगप्रसिद्ध मृदंगम अभ्यासक व वादक वरदराव कमलाकर राव यांचे नोव्हेंबर 2024 मध्ये राजमुंद्री येथे निधन झाले. ते 88 वर्षांचे होते.
- कमलाकर राव हे लहान वयातच मृदंगाचे विद्वान झाले. ते पालगट मणि आयर यांचे शिष्य होते.

## PMECRG आणि महा-ईव्ही मिशन

- ऑक्टोबर 2024 मध्ये, अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन (ANRF) ने त्यांचे पहिले म्हणजे 'प्रधानमंत्री अर्ली करिअर रिसर्च ग्रँट' (PMECRG) आणि 'मिशन फॉर ड्व्हान्समेंट इन हाथ इम्पॅक्ट एरिया - इलेक्ट्रिक व्हेईकल (MAHA-EV) मिशन' हे दोन उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली.
- **प्रधानमंत्री अर्ली करिअर रिसर्च ग्रँट (PMECRG) :** यामध्ये संशोधन प्रक्रिया सुलभ करणे, उच्च-गुणवत्तेच्या कार्याला चालना देणे आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये भारताला जागतिक नेता म्हणून स्थान देणे या उद्देशाने लवचिक बजेट आणि नाविन्यपूर्ण उपक्रम आहेत. यांतर्गत संपूर्ण भारतभर युवा संशोधकांचे पालनपोषण करणे, संशोधन आणि नवकल्पना यांची मजबूत संस्कृती वाढवणे यावर भर देण्यात आला आहे.
- **महा-ईव्ही मिशन :** आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी, देशांतर्गत नवकल्पना वाढवण्यासाठी आणि सरकारच्या आत्मनिर्भर भारत व्हिजनशी सरेखित होऊन भारताला EV क्षेत्रात जागतिक नेता म्हणून प्रस्थापित करण्यासाठी प्रमुख EV तंत्रज्ञान विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.

## ऑसिफिकेशन चाचणी

- आमदार बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणातील एका संशयित अल्पवयीन असल्याचा दावा त्याच्या वकिलांनी केला होता. परंतु पोलिसांना तो अमान्य होता. अखेरीस त्याचे नेमके वय निश्चित करण्यासाठी बोन ऑसिफिकेशन चाचणी (bone ossification test) घेण्यात आली.
- ऑसिफिकेशन ही हाडांच्या निर्मितीची प्रक्रिया असून ही प्रक्रिया भ्रूण विकासाच्या सहाव्या आणि सातव्या आठवड्यांदरम्यान सुरू होते. वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत ती चालू राहते. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर व्यक्तीच्या हाडामध्ये होणारे बदल आणि त्यांचे एकमेकांशी घट्ट होणारे बंध हे ऑसिफिकेशन चाचणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

## म्युरिन टायफसचा संसर्ग

- व्हिएतनाम आणि कंबोडियाहून ऑक्टोबर 2024 मध्ये परतलेल्या केरळमधील 75 वर्षीय व्यक्तीला म्युरिन टायफस (Murine typhus) या जीवाणूजन्य आजाराचे निदान झाले. या दुर्मीळ आजाराचे राज्यातील हे पहिले प्रकरण आहे.
- मुरिन टायफस हा एक संसर्गजन्य आजार आहे; जो पिसूजनित जीवाणू 'रिकेटसिया टायफी' (Rickettsia typhi) मुळे होतो.
- उंदीर आणि मुंगुसाद्वारे हा रोग पसरतो.

## मोहाली येथे भारतातील पहिली बायोमॅन्युफॅक्चरिंग संस्था

- केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंग यांनी ऑक्टोबर 2024 मध्ये पंजाबमधील मोहाली येथे 'BRIC NABI' (BRIC- National Agri-Food Bio-Manufacturing Institute) नामक भारतातील पहिल्या बायोमॅन्युफॅक्चरिंग संस्थेच्या नवीन संकुलाचे उद्घाटन केले.

**BRIC NABI बाबत:**

- नॅशनल ग्री-फूड बायोटेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट (NABI) आणि सेंटर ऑफ इनोव्हेटिव्ह अँड अप्लाईड बायोप्रोसेसिंग (CIAB) यांचे विलीनीकरण करून ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.
- याद्वारे जैवतंत्रज्ञान आणि बायोप्रोसेसिंगमधील कौशल्ये एकत्रित करून कृषी तंत्रज्ञानातील नवकल्पना वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.

**पेअर (PAIR) कार्यक्रम :**

- अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशन (ANRF) ने भारतीय विद्यापीठांमध्ये संशोधन क्षमता वाढवण्यासाठीच्या पेअर (Partnerships for Accelerated Innovation and Research PAIR) कार्यक्रमासाठी नोव्हेंबर 2024 मध्ये भागीदारी सुरू केली.
- हब- अँड स्पोक मॉडेलचा वापर करून, मार्गदर्शन हब-अँड आणि सहकार्यासाठी उदयोन्मुख संस्थांशी (स्पोक्स) शीर्ष-स्तरीय विद्यापीठे (हब) जोडून विद्यापीठ संशोधन वाढवण्याचे पेअर कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

## न्या. के. एस. पुट्टस्वामी

- कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती के. एस पुट्टास्वामी यांचे ऑक्टोबर 2024 मध्ये बेंगळूरू येथे निधन झाले. ते 98 वर्षांचे होते.
- 2012 साली तत्कालीन केंद्र सरकारने सुरु केलेल्या आधार योजनेला के. एस पुट्टास्वामी यांनी विरोध केला होता. तसेच याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. याच सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठाने 2017 साली खासगीपणाचा अधिकार हा घटनात्मक अधिकार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता.

## पंडित राम नारायण

- दिग्गज सारंगी वादक पंडित राम नारायण यांचे नोव्हेंबर 2024 मध्ये मुंबई येथे वयाच्या 96 व्या वर्षी निधन झाले. नारायण हे प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीतकार आणि सारंगी उस्ताद होते.
- राम नारायण यांचा जन्म 25 डिसेंबर 1927 रोजी उदयपूरजवळील अंबर गावात झाला. त्यांचे आडनाव बियावत होते आणि त्यांच्या घराण्यात संगीताचा वारसा होता.
- 1949 मध्ये मुंबईत स्थलांतरित होण्यापूर्वी त्यांनी 1940 च्या मध्यात लाहोर आणि दिल्ली येथे ऑल इंडिया रेडिओमध्ये काम केले.

# संरक्षण व अंतरिक्ष

## MQ-9B ड्रोन करार

- ऑक्टोबर 2024 मध्ये, भारताने आपल्या सशस्त्र दलांसाठी 31 MQ-9B प्रीडेटर सशस्त्र ड्रोन घेण्यासाठी अमेरिकेसोबत 3.5 अब्ज डॉलर्स किमतीचा संरक्षण करार केला.
- या ड्रोनची निर्माती कंपनी जनरल टॉमिक्स भारतात देखभाल आणि दुरुस्तीची (MRO) सुविधा उभारणार आहे.
- या ड्रोनमुळे भारताला जमिनीवर आणि समुद्रावर, विशेषतः चीनकडून होणाऱ्या प्रतिकूल कारवायांचा शोध घेण्यास सक्षम करून, संघर्ष रोखण्यात मदत होईल.

## 4थी आण्विक बॅलिस्टिक मिसाइल पाणबुडी

- भारताने ऑक्टोबर 2024 मध्ये विशाखापट्टणममधील शिप बिल्डिंग सेंटर (SBC) येथे चौथ्या आण्विक बॅलिस्टिक मिसाइल पाणबुडीचे (Ship Submersible Ballistic Nuclear : SSBN) अनावरण केले.
- या पाणबुडीचे नामकरण झाले नसून तिचे सांकेतिक नाव S4* असे आहे.
- विशाखापट्टणममधील शिप बिल्डिंग सेंटर (SBC) ने ही पाणबुडी बांधली होती.
- या पाणबुडीत सुमारे 75% स्वदेशी सामग्री आहे.
- वर्टीकल प्रणालीद्वारे प्रक्षेपित करण्यास सक्षम अशा 3,500 किमी पल्ल्याच्या कलाम - 4 (K-4) आण्विक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी ती सुसज्ज आहे.
- भारताच्या इतर तीन आण्विक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुड्या: आयएनएस अरिहंत, आयएनएस अरिघाट आणि आयएनएस अरिधमन.
- तसेच रशियन अकुला वर्गाची अणुशक्तीवर चालणारी हल्ला पाणबुडी 2028 मध्ये भाडेतत्त्वावर सैन्यात सामील होणार आहे.

## झी-मोर्ह बोगदा प्रकल्पावर अतिरेकी हल्ला

- ऑक्टोबर 2024 मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये झी- मोर्ह बोगदा (Z-Morh Tunnel) बांधत असलेल्या 'पको इन्फ्राटेक' कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. एखाद्या पायाभूत सुविधेसाठी होत असलेल्या प्रकल्पावर दहशतवाद्यांनी केलेला हा पहिलाच हल्ला आहे.

### झी-मोर्ह बोगदा (Z-Morh Tunnel) प्रकल्प:

- झी-मोर्ह बोगदा सोनमर्ग आणि मध्य काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील कंगन शहराला जोडतो
- सोनमर्गपासून जवळ असलेल्या गगनगीर गावाजवळ बोगद्याचे काम साडेआठ हजार फूट उंचीवर सुरू आहे.
- श्रीनगर-लेह महामार्गालगत असलेल्या सोनमर्ग या प्रसिद्ध पर्यटन स्थळाला सर्व हवामानात बाराही महिने कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी हा 6.4 किमी लांबीचा बोगदा आहे.
- झी-मोर्ह बोगदा प्रकल्प हा झोजिला बोगदा प्रकल्पाचा भाग आहे. श्रीनगर ते लडाख हा मार्ग बाराही महिने खुला राहील, या उद्देशाने या प्रकल्पाचे काम सुरू

## न्यूट्रिनोचा अभ्यास करण्यासाठी चीनची जूनो वेधशाळा

- अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर चीनची 'जूनो वेधशाळा' (JUNO Jiangmen Underground Neutrino Observatory) 2025 च्या उत्तरार्धात न्यूट्रिनोवरील डेटा संकलन सुरू करणार आहे.
- सौर प्रक्रियेच्या रिअल-टाइम दृश्यासाठी जूनो वेधशाळा सौर न्यूट्रिनोचे निरीक्षण करेल आणि आवरण संवहन आणि टेक्टोनिक प्लेटच्या हालचालीबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी पृथ्वीवरील युरेनियम आणि थोरियम डिकेपासून न्यूट्रिनोचा अभ्यास करेल.
- 2030 च्या आसपास सुरु होणार असलेल्या यूएस डीप अंडरग्राउंड न्यूट्रिनो प्रयोग (DUNE) च्या आधी 'चीनची मजूनो वेधशाळा' सुरू होईल.

### न्यूट्रिनो म्हणजे काय ?

- न्यूट्रिनो हे कोणताही विद्युत भार नसणारे सबटोमिक कण असतात.
- त्यांचे वस्तुमान लहान असते आणि ते डावखुरे असतात (त्याच्या फिरकीची दिशा त्याच्या गतीच्या दिशेच्या विरुद्ध असते).
- ते विश्वातील सर्वात विपुल कण आहेत. जेव्हा जेव्हा अणु केंद्रक एकत्र होतात (सूर्याप्रमाणे) किंवा वेगळे होतात (विखंडन अणुभट्टी किंवा कण प्रवेगक प्रमाणे) तेव्हा ते तयार होतात.

## पाणबुडीविरोधी जहाज 'अभय'चे अनावरण

- पाणबुडीविरोधी 'अभय' जहाजाचे अनावरण मेसर्स L&T, कट्टुपल्ली येथे 25 ऑक्टोबर 24 रोजी करण्यात आले.
- गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स (GRSE), कोलकाता द्वारे बांधले जाणाऱ्या उथळ पाण्यात पाणबुडीविरोधी युद्ध करण्यास (Anti-Submarine Warfare Shallow Water Craft: ASW SWC) सक्षम एकूण 8 जहाजांपैकी हे सातवे जहाज आहे.
- अर्नाळा-क्लासच्या या जहाजात 80% पेक्षा जास्त भाग स्वदेशी आहे.
- त्याच्या क्षमतांमध्ये शोध अटॅक युनिट (SAU) आणि विमानासह समन्वित ASW ऑपरेशन्स, तटीय पाण्यात उप-पृष्ठीय लक्ष्यांचा प्रतिबंध/नाश यांचा समावेश आहे. हे लो-इंटेन्सिटी मेरीटाइम

ऑपरेशन्स (LIMO) आणि माइन लेइंग ऑपरेशन्समध्ये तैनात केले जाऊ शकते.

### वज्र शॉट गन

- दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेल्या भारतीय नौदलाच्या नेव्हल इनोव्हेशन ॲण्ड इंडिजनायझेशन ऑर्गनायझेशन (एनआयआयओ) सेमिनार 'स्वावलंबन 2024'मध्ये 'वज्र शॉट गन' ही ड्रोनविरोधी बंदूक सादर करण्यात आली.
- वज्र शॉट गन ही हाताने चालविण्यात येणारी आणि वापरण्यास अगदी सोईस्कर अशी अँटी-ड्रोन बंदूक आहे. ही बंदूक ड्रोन सिग्नल शोधू शकते, ड्रोनला निकामी करू शकते आणि ड्रोन व ड्रोनचा ऑपरेटर यांच्यामधील संवादात व्यत्ययदेखील आणू शकते.
- चेन्नईस्थित 'बिग बँग बूम सोल्युशन्स'ने डिझाईन केलेल्या या बंदुकीची रेंज चार किलोमीटरपर्यंत आहे.

### टाटा-एअरबस एअरक्राफ्ट कॉम्प्लेक्सचे उद्घाटन

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांच्या उपस्थितीत 28 ऑक्टोबर 2024 रोजी गुजरातमधील वडोदरा / बडोद्यात टाटा एअरबस एअरक्राफ्ट कॉम्प्लेक्सचे उद्घाटन झाले.
- या प्रकल्पामध्ये सी - 295 या भारतीय हवाईदलाच्या बहुद्देशीय सामरिक मालवाहू विमानाची निर्मिती होणार आहे.
- सी - 295 च्या निमित्ताने भारतात प्रथमच एखाद्या विमानाची पूर्ण निर्मिती, देखभाल-दुरुस्ती, भविष्यात निर्यात या सगळ्या बाबी घडून येतील.

### जपानतर्फे जगातील पहिला लाकडी उपग्रह लिग्नोसॅटचे प्रक्षेपण

- भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी टिकाऊ बांधकाम साहित्य म्हणून लाकडाची व्यवहार्यता तपासण्यासाठी जपानने लिग्नोसॅट (LignoSat) हा जगातील पहिला लाकूड पॅनेल असलेला उपग्रह 5 नोव्हेंबर 2024 रोजी प्रक्षेपित केला.
- हा मिनी उपग्रह स्पेसएक्स मिशन अंतर्गत इंटरनॅशनल स्पेस स्टेशन (ISS) वर पाठवण्यात आला असून तो पृथ्वीपासून सुमारे 400 किलोमीटरवर स्थित असेल.
- क्योटो युनिव्हर्सिटी आणि जपानच्या सुमितोमो फॉरेस्ट्री यांनी लिग्नोसॅट उपग्रह विकसित केला आहे.
- स्क्रू किंवा गोंद न वापरता, पारंपरिक जपानी तंत्रांचा वापर करून मॅग्नोलियाच्या झाडापासून तयार केलेल्या लाकडी पॅनेल्सपासून हा उपग्रह बनवण्यात आला आहे.
- या उपग्रहात पारंपरिक ॲल्युमिनियम स्ट्रक्चर्स आणि इलेक्ट्रॉनिक्सचा समावेश आहे आणि लाकूड हे आवरण सामग्री म्हणून काम करते.
- ॲल्युमिनियमचे बनलेले पारंपरिक उपग्रह जव्हा वातावरणात जळतात तेव्हा ओझोनच्या थराला हानी पोहोचवू शकतात. तसेच मेगा-नक्षत्रांसह उपग्रहांची वाढती संख्या अवकाशातील प्रदूषणाची चिंता वाढवत आहे. ॲल्युमिनियमऐवजी मॅग्नोलियापासून बनवलेल्या लिनोसॅट पृथ्वीवर परत येताना कोणतेही हानिकारक प्रदूषण करणार नाही.

### 31 MQ-9B सशस्त्र ड्रोनसाठी भारत-अमेरिका करार

- भारत आणि यूएसने 31 MQ-9B सशस्त्र हाय अल्टिट्यूड लाँग एन्ड्युरन्स (HALE) रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट सिस्टम (RPAS) च्या खरेदीसाठी 3.5 अब्ज डॉलरचा करार 15 ऑक्टोबर 2024 रोजी केला.
- 31 RPAS किंवा प्रीडेटर ड्रोनमध्ये नौदलासाठी 15 सी गार्डियन (Sea Guardians) आणि हवाई दल आणि लष्करासाठी प्रत्येकी 8 स्काय गार्डियन (Sky Guardians) समाविष्ट आहेत.

### LRLACM क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी

- संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) ने 12 नोव्हेंबर 2024 रोजी ओडिशाच्या किनाऱ्याजवळील एकात्मिक चाचणी रेंज (ITR), चांदीपूर येथून 1000 किलोमीटर पल्ला असणाऱ्या 'लांब पल्ल्याच्या लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्रा'ची (Long Range Land Attack Cruise Missile : LRLACM) पहिली उड्डाण चाचणी घेतली.
- भारत डायनॅमिक्स लिमिटेड, हैदराबाद आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, बेंगळुरू हे LRLLACM साठी दोन विकास-सह-उत्पादन-भागीदार आहेत आणि ते क्षेपणास्त्र विकास आणि एकत्रीकरणामध्ये गुंतलेले आहेत.
- LRLACM क्षेपणास्त्र हे मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचर वापरून जमिनीवरून लॉन्च करण्यासाठी आणि युनिव्हर्सल व्हर्टिकल लॉन्च मॉड्यूल सिस्टम वापरून फ्रंटलाइन जहाजांवरून लॉन्च करण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

### पिनाका शस्त्र प्रणालीच्या यशस्वी उड्डाण चाचण्या

- संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) ने मार्गदर्शक पिनाका मल्टी-बॅरल रॉकेट (MBRL) प्रणालीच्या उड्डाण चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्याची घोषणा 14 नोव्हेंबर 2024 रोजी केली.
- यामुळे पिनाकाचा पल्ला 75 किमी पेक्षा जास्त वाढणार आहे.
- भारतीय लष्कराच्या चार पिनाका रेजिमेंट सेवेत आहेत आणि आणखी सहा ऑर्डरवर आहेत.

## संरक्षण व अंतरिक्ष (At a Glance)

- **नसीम अल बहर :**
  - भारत-ओमान यांच्यातील 'नसीम-अल-बहर' (Naseem Al Bahr) नामक द्विपक्षीय नौदल सराव ऑक्टोबर 2024 पासून गोव्यात आयोजित करण्यात आला. या सरावात भारतातर्फे आयएनएस त्रिकंद आणि डॉर्नियर मेरीटाईम पेट्रोल एअरक्राफ्टने आणि ओमानच्या रॉयल नेव्हीतर्फे वेसल अल सीबने भाग घेतला.
  - नसीम अल बहर हा सराव पहिल्यांदा 1993 मध्ये आयोजित करण्यात आला होता. तो हार्बर टप्पा आणि समुद्राचा टप्पा अशा दोन टप्प्यात आयोजित केला जातो.
  - **भारत आणि ओमानमधील इतर सराव:** अल नजाह (लष्करी); ईस्टर्न ब्रिज (हवाई दल)
- **आर्मेनिया: भारताचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र आयातदार देश:** आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये भारताने आर्मेनियाला 21,083 कोटी रुपयांच्या शस्त्रास्त्रांची निर्यात केली आहे. त्यामुळे आर्मेनिया हा पश्चिम आशियाई देश शस्त्रास्त्र निर्यातीसाठी भारताचे सर्वोच्च गंतव्य स्थान ठरला आहे.
- **महासागर संवादाची तिसरी आवृत्ती**
  - भारतीय नौदलाने 5 नोव्हेंबर 2024 रोजी महासागर या उच्चस्तरीय आभासी संवादाची तिसरी आवृत्ती आयोजित केली. या संवादाची संकल्पना 'IOR मधील सामाईक सागरी सुरक्षा आव्हाने कमी करण्यासाठी प्रशिक्षण सहकार्य' ही होती.
  - महासागर (MAHASAGAR) म्हणजे Maritime Heads for Active Security And Growth for All in the Region
  - भारतीय नौदलाने सुरू केलेला हा उपक्रम द्वि- वार्षिक आयोजित केला जातो आणि 2023 मध्ये त्याची स्थापना झाल्यापासून सहभागी राष्ट्रांमध्ये व्यापक स्वीकृती मिळवली आहे.
- **तिसरी भारतीय अंतराळ परिषद**
  - 5 ते 7 नोव्हेंबर 2024 दरम्यान नवी दिल्ली येथे तिसऱ्या भारतीय अंतराळ परिषदेचे आयोजन करण्यात आले. 'इंडियन स्पेस असोसिएशन' (ISPA) या ना-नफा उद्योग संस्थेद्वारे या परिषदेचे आयोजन करण्यात आले.
  - सॅटेलाइट कम्युनिकेशन (सॅटकॉम) आणि इंडो- युरोपियन युनियन स्पेस भागीदारीवर लक्ष केंद्रित करून भारताच्या विस्तारित अंतराळ क्षमतांवर या परिषदेमध्ये प्रकाश टाकण्यात आला. प्रमुख चर्चांमध्ये डिजिटल इंडिया आणि भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ उद्दिष्टांना पुढे नेण्यात सॅटकॉमची भूमिका जाणून घेण्यात आली.
- **भारताची पहिली मंगळ आणि चंद्र ॲनालॉग मोहीम**
  - भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (ISRO) नेतृत्वाखाली लेह, लडाख येथे भारताच्या पहिल्या मंगळ आणि चंद्र ॲनालॉग मोहिमेचे (Mars and Moon Analog Mission) उद्घाटन नोव्हेंबर 2024 मध्ये करण्यात आले.
  - AAKA स्पेस स्टुडिओ, लडाख विद्यापीठाच्या सहकार्याने ISRO या मोहिमेचे नेतृत्व करत आहे आणि लडाख ऑटोनॉमस हिल डेव्हलपमेंट कौन्सिलने या मोहिमेला समर्थन दिले आहे.
- **अंतरिक्ष अभ्यास 2024:**
  - संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत डिफेन्स स्पेस एजन्सीने नवी दिल्ली येथे 'अंतरिक्ष अभ्यास' नामक भारताचा पहिला वहिला अंतरिक्ष सराव नोव्हेंबर 2024 मध्ये आयोजित केला.
  - अंतरिक्षातील राष्ट्रीय धोरणात्मक उद्दिष्टे सुरक्षित करण्यासाठी अंतरिक्ष-आधारित मालमत्ता आणि सेवांना आणि त्यांच्याकडून येणाऱ्या धोक्यांचे अनुकरण आणि विश्लेषण करणे हे त्यामागील उद्दिष्ट होते.
  - लष्करी ऑपरेशनमध्ये अंतरिक्ष क्षमतेचे एकीकरण वाढवणे आणि अंतरिक्ष मालमत्तेवरील ऑपरेशनल अवलंबित्वांची चांगली समज प्रदान करणे या गोष्टींवर सरावात लक्ष्य केंद्रित करण्यात आले होते.
- **ऑस्ट्राहिंद :**
  - महाराष्ट्रातील विदेशी प्रशिक्षण नोड येथे, नोव्हेंबर 2024 मध्ये, ऑस्ट्राहिंद (AUSTRAHIND) सरावाची तिसरी आवृत्ती सुरू झाली.
  - संयुक्त ऑपरेशन्समध्ये लष्करी सहकार्य आणि आंतरकार्यक्षमता वाढवण्याच्या उद्देशाने भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात प्रतिवर्षी आयोजित केला जाणारा हा लष्करी सराव आहे.
- **इंडियन मिलिटरी हेरिटेज फेस्टिव्हल**
  - चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी 8 नोव्हेंबर 2024 रोजी नवी दिल्ली येथे वार्षिक इंडियन मिलिटरी हेरिटेज फेस्टिव्हल (IMHF) च्या दुसऱ्या आवृत्तीचे उद्घाटन केले.
  - या दोन दिवसीय महोत्सवात भारताची राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण, लष्करी इतिहास आणि लष्करी वारसा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या जागतिक आणि भारतीय थिंक टैंक, कॉर्पोरेशन, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील उपक्रम, ना-नफा संस्था, शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधन अभ्यासकांना सहभागी करून घेण्याचे या फेस्टिव्हलचे उद्दिष्ट होते.

- **प्रोजेक्ट शौर्य गाथा:**
  - चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी 8 नोव्हेंबर 2024 रोजी 'शौर्य गाथा' हा प्रकल्प देखील सुरू केला.
  - भारताच्या लष्करी व्यवहार विभाग आणि United Service Institution (USI) नामक थिंक टँकचा हा एक उपक्रम असून त्याचा उद्देश शिक्षण आणि पर्यटनाच्या माध्यमातून भारताच्या लष्करी वारशाचे संवर्धन आणि प्रचार करणे आहे.
- **उत्तर कोरियाद्वारे 'Hwasong-19' ची चाचणी:** उत्तर कोरियाने 'ह्रासाँग-19' (Hwasong-19) या आपल्या नवीनतम आंतरखंडीय क्षेपणास्त्राची (ICBM) यशस्वी चाचणी नोव्हेंबर 2024 मध्ये जाहीर केली. हे 'जगातील सर्वात शक्तिशाली क्षेपणास्त्र' असल्याचा दावा उत्तर कोरियाच्या राज्य माध्यमांनी केला आहे.
- **तेलंगणातील नौदल कम्युनिकेशन स्टेशनची पायाभरणी:** ऑक्टोबर 2024 मध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तेलंगणातील विकाराबाद येथील दामगुंडम राखीव वन येथे भारतीय नौदलाच्या नवीन अत्यंत कमी वारंवारता (VLF) स्टेशनची पायाभरणी केली. 2900 एकर आणि 3200 कोटी रुपये खर्चाच्या या सुविधेचे उद्दिष्ट नौदलाची दळणवळण क्षमता वाढवणे, जटिल सागरी वातावरणात प्रभावी कमांड आणि नियंत्रणासाठी आवश्यक सुरक्षित आणि विश्वासार्ह लांब अंतराचे प्रसारण सुलभ करणे हे आहे.
- **नासाच्या युरोपा क्लिपर मिशनचे प्रक्षेपण:**
  - अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (NASA) ने गुरू ग्रहाचा चंद्र युरोपा (Europa) वरील जीवसृष्टीच्या संभाव्यतेचा शोध घेण्यासाठी 14 ऑक्टोबर 2024 रोजी युरोपा क्लिपर मिशन प्रक्षेपित केले.
  - युरोपा क्लिपर हे गुरूच्या चंद्राच्या बर्फाळ पृष्ठभागाचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याखाली अस्तित्वात असलेल्या भूपृष्ठावरील महासागराचा अभ्यास करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.
  - 1.8 अब्ज मैल (3 अब्ज किमी) प्रवास करून, युरोपा क्लिपरला गुरूपर्यंत पोहोचण्यासाठी साडेपाच वर्षे लागतील, त्याच्या मार्गात मंगळ आणि पृथ्वीच्या अनेक फ्लायबाय चालतील. ते 2030 मध्ये युरोपाजवळ पोहोचणे अपेक्षित असून 2031 मध्ये त्याचे वैज्ञानिक ऑपरेशन सुरू होईल.
- **काकसर पुलाला कॅप्टन अमित भारद्वाज यांचे नाव:**
  - कारगिल युद्धादरम्यान कॅप्टन अमित भारद्वाज यांच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी कारगिलमधील काकसर पुलाचे नाव बदलून कॅप्टन अमित भारद्वाज सेतू असे करण्यात आले. 1999 च्या कारगिल युद्धादरम्यान, 4 JAT बटालियनचे कॅप्टन अमित भारद्वाज काकसर, कारगिल येथे तैनात होते.
  - शोध आणि बचाव गस्तीचे नेतृत्व करत, त्यांनी. आपल्या पलटणला घुसखोरांच्या हल्ल्यापासून यशस्वीरित्या वाचवले आणि शेवटी देशाच्या सेवेत आपल्या प्राणाची आहुती दिली.
- **सिम्बेक्स (SIMBEX 2024):** सिंगापूर आणि भारत यांच्यातील वार्षिक द्विपक्षीय सागरी सराव सिम्बेक्स (SIMBEX: Singapore India Maritime Bilateral Exercise) ची 31 वी आवृत्ती 23 ते 29 ऑक्टोबर 2024 या कालावधीत विशाखापट्टणम येथील ईस्टर्न नेव्हल कमांड (ENC) येथे आयोजित करण्यात आली.
- **चाणक्य संरक्षण संवाद 2024:**
  - चाणक्य संरक्षण संवाद 2024 (Chanakya Defence Dialogue) चा समारोप 25 ऑक्टोबर 2024 रोजी दिल्लीतील माणेकशॉ सेंटर येथे झाला. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राची ही दुसरी आवृत्ती होती.
  - चर्चासत्राची संकल्पना: Drivers in Nation Building: Fuelling Growth Through Comprehensive Security
  - हे वार्षिक आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आहे जे गंभीर सुरक्षा समस्यांवर चर्चा करण्यासाठी लष्करी तज्ञ, रणनीतिकार आणि संरक्षण नेत्यांना एकत्र आणते.
- **वज्र प्रहार :** भारत आणि अमेरिका यांच्यातील वज्र प्रहार नामक संयुक्त स्पेशल फोर्सेस सराव नोव्हेंबर 2024 मध्ये यूएसए मधील आयडाहो येथील ऑर्चर्ड कॉम्बॅट ट्रेनिंग सेंटरमध्ये पार पडला. यापूर्वी डिसेंबर 2023 मध्ये या सरावाचे आयोजन उमरोई, मेघालय येथे करण्यात आले होते.
- **गरुड शक्ती 2024:** भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील 'गरुड शक्ती 2024' नामक संयुक्त स्पेशल फोर्सेस सराव नोव्हेंबर 2024 मध्ये सिजंटुंग, जकार्ता, इंडोनेशिया येथे पार पडला.
- **VINBAX 2024 :** भारत आणि व्हिएतनाममधील द्विपक्षीय लष्करी सराव 4-23 नोव्हेंबर 2024 दरम्यान अंबाला आणि चंडीमंदिर येथे झाला. या सरावात भारतीय लष्कर आणि भारतीय हवाई दल तसेच व्हिएतनाम पीपल्स आर्मीच्या जवानांचा समावेश होता.
- **'पूर्वी प्रहार' त्रिसेवा सराव:** पूर्व आघाडीवर लष्करी तत्परता बळकट करण्याच्या उद्देशाने भारताने 8 नोव्हेंबर 2024 पासून 10 दिवस मपूर्वी प्रहारफ हा महत्त्वपूर्ण त्रि-सेवा लष्करी सराव आयोजित केला. हा सराव डेपसांग आणि डेमचोकसह पूर्व लडाखमधील चीनसोबतच्या प्रमुख घर्षण बिंदूंवर झाला.

- **सी व्हीजील 2024:**
  - नोव्हेंबर 2024 मध्ये सी व्हिजिल - 24 (Sea Vigil-24) नामक संपूर्ण भारतातील किनारपट्टी संरक्षण सरावाचे आयोजन करण्यात आले.
  - हा सराव भारताची किनारपट्टी सुरक्षा आणि सागरी संरक्षण यंत्रणा मजबूत करण्यासाठी डिझाइन करण्यात आला होता.
- **झिम्बाब्वेच्या ZIMSAT-2 उपग्रहाचे प्रक्षेपण:** झिम्बाब्वेने आपला दुसरा उपग्रह, ZIMSAT-2, रशियातील व्होस्टोचनी कॉस्मोड्रोम येथून नोव्हेंबर 2024 मध्ये प्रक्षेपित केला. उच्च-रिझोल्यूशन मल्टीस्पेक्ट्रल कॅमेराने सुसज्ज असलेला हा उपग्रह कृषी, संसाधन शोध, पर्यावरण निरीक्षण आणि आपत्ती व्यवस्थापनात मदत करेल.
- **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आयएनएस विक्रांतवरून नौदलाच्या ऑपरेशनमध्ये सामील:** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 7 नोव्हेंबर रोजी स्वदेशी विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतवरून समुद्रात भारतीय नौदलाच्या जहाजांना भेट दिली. यावेळी त्यांनी भारतीय नौदलाच्या लढाऊ क्षमता आणि सागरी पराक्रमाचे प्रदर्शन करणाऱ्या प्रगत ऑपरेशनल प्रात्यक्षिकांची मालिका पाहिली.
- **पँटसीर हवाई संरक्षण क्षेपणास्त्र बंदूक प्रणाली:**
  - देशाच्या हवाई संरक्षण क्षमतांना बळ देण्याच्या उद्देशाने भारताने पँटसीर हवाई संरक्षण क्षेपणास्त्र बंदूक प्रणालीच्या (Pantsir air defence missile and gun System) विविध प्रकारांच्या खरेदीसाठी नोव्हेंबर 2024 मध्ये रशियाशी एक मोठा संरक्षण करार केला.
  - ही प्रणाली लहान ते मध्यम पल्ल्याच्या पृष्ठभागावरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांना दुहेरी 30 मिमी स्वयंचलित तोफांसह एकत्रित करते, ज्यामुळे एक बहुस्तरीय संरक्षण तयार होते.
  - प्रगत रडार आणि ट्रॅकिंग सिस्टीमसह सुसज्ज ही प्रणाली 36 किलोमीटर दर आणि 15 किलोमीटर उंचीवर लक्ष्य शोधू शकते आणि नष्ट करू शकते.
- **प्रोजेक्ट आकाशतीर :** हा भारतीय लष्कराचा (Indian Army) देशाच्या हवाई संरक्षण प्रणालीला पूर्णतः स्वयंचलित, एकात्मिक दृष्टीकोनातून आधुनिकीकरण करण्याचा उपक्रम आहे. आकाशतीर हवाई संरक्षण नियंत्रण आणि रिपोर्ट प्रक्रिया स्वयंचलित करण्यासाठी आणि रिअल-टाइम एअर पिक्चर तयार करण्यासाठी डिजिटायझेशनचा वापर करते. हे भारतीय लष्कर आणि भारतीय वायुसेना (IAF) मधील सेन्सर देखील समाकलित करते.
- **'ज्ञान शक्ती': जयपूरमध्ये दक्षिण पश्चिम कमांडचा नवीन थिंक टँक:** राजस्थानचा संरक्षण औद्योगिक पाया मजबूत करण्यासाठी, लष्कराच्या जयपूर स्थित दक्षिण पश्चिम कमांडने ज्ञान शक्ती नावाच्या थिंक टँकची स्थापना केली आहे. प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर संरक्षण आणि सुरक्षा या दोन्ही विषयांवर सशस्त्र सेना, उद्योग, राज्य सरकार आणि शैक्षणिक संस्था यांच्यात चर्चा आणि सहकार्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.






# आर्थिक

### गॅलेथिया खाडीतील ट्रान्सशिपमेंट पोर्टला प्रमुख बंदराचा दर्जा

- बंगालच्या उपसागरातील ग्रेट निकोबार बेटावर स्थित गॅलेथिया खाडी (Galathea Bay) येथील मेगा इंटरनॅशनल कंटेनर ट्रान्सशिपमेंट पोर्ट (ICTP) अधिकृतपणे भारतातील प्रमुख बंदर (major port) म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. सारख्या प्रमुख ट्रान्सशिपमेंट केंद्रांच्या जवळ आहे. हे स्थान जागतिक व्यापार नेटवर्कमध्ये त्याचे महत्त्व वाढवते.
- जागतिक सागरी व्यापाराचा 35% हाताळणी करणारा प्रमुख शिपिंग मार्ग असणाऱ्या मलाक्का सामुद्रधुनीपासून अवघ्या 40 नॉटिकल मैलांवर स्थित ICTP बंदर हे भारताच्या पूर्व किनारपट्टी, बांगलादेश आणि म्यानमार येथून मालवाहतुकीसाठी प्रमुख ट्रान्सशिपमेंट हब म्हणून काम करेल.

### 102 टन सोने इंग्लंडकडून भारताकडे

- एप्रिल ते सप्टेंबर 2024 या सहामाहीत लंडनमधील बँक ऑफ इंग्लंड (BoE) च्या तिजोरीतून 102 मेट्रिक टन सोने मायदेशी आणल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) धनत्रयोदशीच्या दिवशी म्हणजेच 29 ऑक्टोबर 2024 रोजी जाहीर केले. त्यामुळे रिझर्व्ह बँकेकडील सोन्याचा साठा वाढला आहे.

**पार्श्वभूमी :**

- 1990-91 च्या परकीय चलनाच्या संकटादरम्यान, भारताने 405 दशलक्ष डॉलर्सचे कर्ज सुरक्षित करण्यासाठी बँक ऑफ इंग्लंडकडे आपल्या सोन्याच्या साठ्याचा काही भाग गहाण ठेवला होता.
- कर्जाची परतफेड नोव्हेंबर 1991 पर्यंत झाली असली तरी, आरबीआयने लॉजिस्टिक कारणास्तव हे सोने यूकेमध्ये ठेवणे निवडले होते, कारण परदेशात साठवलेले सोने व्यापारासाठी, स्वॅपमध्ये प्रवेश करण्यासाठी आणि परतावा मिळवण्यासाठी सहज वापरता येऊ शकते.
- आता मात्र ते पुन्हा भारतात आणल्याने रिझर्व्ह बँकेकडील सोन्याचा साठा वाढला आहे.
- देशातच सोन्याची साठवणूक केल्याने बँक ऑफ इंग्लंडसारख्या परदेशी बँकेला देण्यात येणाऱ्या साठवणूक खर्चात मोठी बचत होणार आहे. याचबरोबर हे भारतीय अर्थव्यवस्थेबाबत आत्मविश्वासाचे संकेत आहेत.

### FPI ते FDI च्या पुनर्वर्गीकरणासाठी RBI चे फ्रेमवर्क

- नोव्हेंबर 2024 मध्ये, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांना (Foreign Portfolio Investors: FPI) त्यांची गुंतवणूक थेट परकीय गुंतवणुकीत (Foreign Direct Investment FDI) रूपांतरित करण्याची परवानगी देण्यासाठी एक फ्रेमवर्क सादर केले.

**फ्रेमवर्कमधील ठळक मुद्दे:**

- एकूण पेड-अप इक्विटीच्या 10% पेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या कोणत्याही परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदाराकडे (FPIs) त्यांचे होल्डिंग्स विकण्याचा किंवा होल्डिंगचे पुनर्वर्गीकरण FDI मध्ये करण्याचा पर्याय आहे.
- FDI म्हणजे भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तीने भांडवली साधनांद्वारे केलेली गुंतवणूक.

### SBI, HDFC Bank आणि ICICI Bank यांना D-SIB दर्जा

- भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) 13 नोव्हेंबर 2024 रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI), HDFC बँक आणि ICICI बँक यांचा 'डोमेस्टिक सिस्टमिकली इम्पॉर्टंट बँक्स' (Domestic Systemically Important Banks (D-SIBs) दर्जा कायम ठेवला.
- रिझर्व्ह बँकेने 2015 आणि 2016 मध्ये SBI आणि ICICI बँकेला D-SIB म्हणून नियुक्त केले आणि HDFC बँक 2017 मध्ये सामील झाली.

### जागतिक पेटंट फाइलिंगसाठी भारत जगात सहाव्या क्रमांकावर

- जागतिक बौद्धिक संपदा संघटनेच्या (WIPO) नोव्हेंबर 2024 मध्ये प्रसिद्ध अहवालानुसार 2023 मध्ये जागतिक पेटंट फाइलिंगमध्ये भारत जगात सहाव्या क्रमांकावर राहिला.
- 2023 मध्ये भारताच्या पेटंट अर्जांमध्ये 15.7% वाढ झाली, जी त्या वर्षी जागतिक पेटंट फाइलिंगमधील 15.7% वाढीमध्ये एक प्रमुख घटक होती.

**2023 मध्ये सर्वाधिक पेटंट दाखल करणारे देश:**

1) चीन: 1.64 दशलक्ष
2) यूएस: 518,364
3) जपान: 414413
4) दक्षिण कोरिया: 287, 954
5) जर्मनी: 133,053 6) भारत: 64480

### आर्थिक (At a Glance)

- **WTSA-24 आणि IMC 24 :**
  - ऑक्टोबर 2024 मध्ये नवी दिल्ली येथे वर्ल्ड टेलिकम्युनिकेशन स्टँडर्डायझेशन असेंब्ली (World Standardisation Telecommunication Assembly (WTSA) 24)

आणि इंडिया मोबाइल काँग्रेस- 2024 (India Mobile Congress-2024) च्या उद्घाटन सत्रांना संबोधित करताना, पंतप्रधान मोदींनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या जबाबदार वापरासह डिजिटल अनुप्रयोगांसाठी जागतिक नियामक फ्रेमवर्क विकसित करण्याची वकिली केली.

- WTSA-24 चे आयोजन इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियन (ITU) द्वारे दर चार वर्षांनी केले जाते.

- **केंद्रीय कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता**
  - केंद्र सरकारचे एक कोटीहून अधिक कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारक यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यात आली आहे.
  - 1 जुलै 2024 पासून पूर्वलक्ष्यी प्रभावाने ही वाढ लागू करण्यात आली आहे. मागील 12 महिन्यांच्या महागाई निर्देशांकाच्या सरासरीच्या आधारे महागाई भत्त्यात वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे.

- **शहरी जमीन अभिलेखांवर आंतरराष्ट्रीय कार्यशाळा**
  - ऑक्टोबर 2024 मध्ये, ग्रामीण विकास मंत्रालयाने शहरी जमिनीच्या नोंदींसाठी सर्वेक्षण पुनर्वेक्षणातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर (Modern Technologies in Survey-Resurvey for Urban Land Records) या विषयावर आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले होते.
  - 100 हून अधिक शहरे /नगरांमध्ये शहरी जमिनीच्या नोंदी तयार करण्यासाठी नॅशनल जिओस्पेशिअल नॉलेज-आधारित लँड सर्व्हे ऑफ अर्बन हॅबिटेशन्स (NAKSHA) नावाचा प्रायोगिक कार्यक्रम सुरू करण्यात आला.
  - भूमी अभिलेख निर्मितीमध्ये ड्रोनचा वापर आणि थ्रीडी इमेजरीसह हवाई छायाचित्रण यावर प्रकाश टाकण्यात आला.

- **पर्यावरण जहाज निर्देशांकामध्ये मुरगाव बंदराचा समावेश :** ऑक्टोबर 2024 मध्ये, गोव्यातील मुरगाव बंदर प्राधिकरण (MPA) हे त्याच्या हरितश्रे कार्यक्रमासाठी मपर्यावरण जहाज निर्देशांक (Environmental Ship Index: ESI) पोर्टलवर सूचीबद्ध झाले. या निर्देशांकावर सूचीबद्ध होणारे ते पहिले भारतीय बंदर बनले आहे.

- **पर्यावरणीय जहाज निर्देशांक (ESI):**
  - 1 जानेवारी 2011 रोजी ESI उपक्रम सुरू झाला आणि तेव्हापासून त्याचा डेटाबेस इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ पोर्ट्स अँड हार्बर्स (IAPH) च्या प्रशासना अंतर्गत आहे.
  - जहाजांद्वारे उत्सर्जित नायट्रोजन ऑक्साईड्स (NOx) आणि सल्फर ऑक्साईड्स (SOx) च्या उत्सर्जनाचे मूल्यांकन हा निर्देशांक करतो. निर्देशांकामध्ये जहाजांमधून हरितगृह वायू उत्सर्जन रिपोर्ट करण्याची देखील योजना समाविष्ट आहे.

- **कोल इंडिया लिमिटेडचा 50 वा वर्धापन दिन:**
  - कोळसा मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी कोल इंडिया लिमिटेड (CIL) ने 3 नोव्हेंबर 2024 कोलकाता येथील मुख्यालयात 50 वा वर्धापन दिन साजरा केला. या निमित्ताने सुवर्ण महोत्सवी लोगो आणि अंगारा या शुभंकराचे अनावरण करण्यात आले.
  - 1975 मध्ये साली स्थापना झालेली CIL ही भारतातील सरकारी मालकीची कंपनी देशातील कोळसा संसाधनांचे उत्पादन आणि व्यवस्थापन करण्यासाठी जबाबदार आहे. ती जगातील सर्वात मोठी कोळसा उत्पादक कंपनी आहे.

- **सेंट्रलाइज्ड ॲसेट लिक्विडेशन ऑक्शन प्लॅटफॉर्म**
  - भारतीय दिवाळखोरी आणि नादारी मंडळ (Insolvency and Bankruptcy Board of India: IBBI) आणि इंडियन बँक्स असोसिएशन (IBA) यांनी दिवाळखोरी आणि नादारी संहिता (IBC) अंतर्गत मालमत्तेचा लिलाव करण्यासाठी एक केंद्रीकृत प्लॅटफॉर्म तयार करण्याची योजना आखली आहे.
  - मालमत्तेचा लिलाव eBKray प्लॅटफॉर्मद्वारे केला जाईल. हा प्लॅटफॉर्म गेल्या पाच वर्षांपासून SARFAESI कायदा, 2002 अंतर्गत गहाण ठेवलेल्या मालमत्तेसाठी लिलाव चालवत आहे. 12 सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा एक संघ असणाऱ्या PSB Alliance Private Limited द्वारे eBKray प्लॅटफॉर्म व्यवस्थापित केला जातो.
  - हा केंद्रीकृत प्लॅटफॉर्म लिक्विडेशन प्रकरणांमध्ये सर्व मालमत्तेसाठी एकल सूची बिंदू म्हणून काम करेल, ज्यासाठी लिकिडेटर्सकडून तपशीलवार मालमत्ता माहिती आवश्यक आहे.

- **वाहतूक वाहनांसाठी एलएमव्ही परवाना ग्राह्य :** हलक्या मोटार वाहनासाठी (LMV) ड्रायव्हिंग परवाना असणाऱ्या व्यक्तीला 7500 किलोपर्यंतचे वाहतूक वाहन (Transport Vehicle) चालविण्याचा अधिकार असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायलयाने नोव्हेंबर 2024 मध्ये दिला. सर्वोच्च न्यायलयाने 2017 मध्ये दिलेला आपला निर्णय कायम ठेवला आहे.

- **एपिक्लोरोहायड्रिन आयातीवर अँटी डंपिंग शुल्क :** स्वस्त आयातीपासून देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी भारताने नोव्हेंबर 2024 मध्ये चीन, कोरिया आणि थायलंडमधून आयात होणाऱ्या एपिक्लोरोहायड्रिनवर (Epichlorohydrin) प्रति टन USD 557 पर्यंत अँटी- डंपिंग (AD) शुल्क लादले आहे.

- **भारतातील पहिल्या स्वदेशी बुलेट ट्रेनसाठी BEML ला कंत्राट:**
  - भारतातील पहिली स्वदेशी बनावटीची बुलेट ट्रेन डिझाईन, उत्पादन आणि कमिशन करण्यासाठी इंटिग्रल कोच फॅक्टरी (ICF) कडून सरकारी मालकीच्या BEML (Bharat Earth

Movers Limited) ला 866.87 कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले आहे.

- यात प्रत्येकी आठ कार्स असणारे दोन हाय-स्पीड ट्रेनसेट असतील. या ट्रेन्सचा चाचणी वेग 280 किमी / ताशी असेल आणि ऑपरेशनल वेग 250 किमी/ताशी असेल.
- BEML च्या बेंगळुरू सुविधेत या ट्रेन्स उत्पादित केल्या जाणार असून त्या 2026 मध्ये सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे.

- **इंडियन गेमिंग कन्व्हेन्शन (IGC) 2024:** इंटरनेट आणि मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया (IAMAI) संघटनेने 14-15 ऑक्टोबर 2024 रोजी ताज पॅलेस, नवी दिल्ली येथे इंडियन गेमिंग कन्व्हेन्शन (IGC) च्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन केले.
- **ITU-WTSA आणि इंडिया मोबाइल काँग्रेस 2024 चे उद्घाटन:** 15 ऑक्टोबर 2024 रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे इंडिया मोबाइल काँग्रेस (IMC) च्या आठव्या आवृत्तीसह, भारतात आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) द्वारे आयोजित केलेल्या पहिल्या-वहिल्या 'जागतिक दूरसंचार मानकीकरण सभे'चे (World Telecommunication Standardization Assembly: ITU-WTSA) उद्घाटन केले.
- **आगाऊ आरक्षण कालावधी 120 वरून 60 दिवसांवर:** भारतीय रेल्वेने 1 नोव्हेंबर 2024 पासून लांब पल्ल्याच्या ट्रेन बुकिंगसाठी आगाऊ आरक्षण कालावधी 120 दिवसांवरून 60 दिवसांपर्यंत कमी करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयाचा उद्देश प्रवाशांच्या सोयी वाढवणे हा आहे.
- **शिलॉन्ग हे 2025 मध्ये भारतीय प्रवाशांसाठी टॉप ट्रॅव्हल डेस्टिनेशन:** ऑक्टोबर 2024 मध्ये प्रसिद्ध झालेल्या Skyscanner च्या Travel Trends Report अहवालानुसार शिलाँग हे 2025 मध्ये भारतीय प्रवाशांसाठी सर्वात लोकप्रिय गंतव्यस्थान म्हणून उदयास आले आहे.
- **गुगलचे मुख्य तंत्रज्ञ म्हणून प्रभाकर राघवन यांची नियुक्ती:** प्रभाकर राघवन यांची गुगलचे मुख्य तंत्रज्ञ (Chief Technologist) म्हणून ऑक्टोबर 2024 मध्ये नियुक्ती करण्यात आली.
- **राजीव रंजन सिंह यांच्या हस्ते 21 व्या पशुगणनेचे उद्घाटन:** केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंग यांच्या हास्ये 21 व्या पशुगणना ऑपरेशनचे उद्घाटन करण्यात आले. हा भारताच्या पशुधन क्षेत्रावरील सर्वसमावेशक डेटा गोळा करण्याच्या उद्देशाने एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.
- **17 वी अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फरन्स आणि एक्स्पो 2024:** मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी ऑक्टोबर 2024 मध्ये गुजरातमधील गांधीनगर येथील महात्मा मंदिर कन्व्हेन्शन सेंटरमध्ये 17 व्या अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फरन्स आणि एक्सपो-2024 चे उद्घाटन केले. स्टॅंडर्डायझेशन अँड ऑप्टिमायझेशन ऑफ अर्बन ट्रान्सपोर्ट सोल्युशन्स ही या परिषदेची संकल्पना होती. 25 ते 27 ऑक्टोबर 2024 या कालावधीत आयोजित हा कार्यक्रम भारतातील शहरी वाहतुकीच्या भवितव्यावर चर्चा करण्यासाठी 2,000 हून अधिक व्यावसायिक आणि शिक्षणतज्ज्ञांना एकत्र करतो.
- **प्रवीणा राय यांची MCX चे CEO आणि MD म्हणून नियुक्ती:**
  - प्रवीणा राय यांनी 31 ऑक्टोबर 2024 रोजी मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया (MCX) च्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि व्यवस्थापकीय संचालक (MD) म्हणून अधिकृतपणे पदभार स्वीकारला. त्यांना पाच वर्षांचा कार्यकाळ मिळणार आहे.
- **बिहारच्या सुलतानगंज स्टेशनचे अजगाईनाथ धाम असे नामांतर:** बिहारच्या भागलपूर जिल्ह्यातील सुलतानगंज रेल्वे स्थानकाचे नाव पूज्य हिंदू धर्मस्थळ, अजगाईनाथ धामच्या सन्मानार्थ बदलले जाणार आहे. भागलपूरच्या नगरपरिषदेने स्थानकाचे नाव बदलण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. याबाबतचा प्रस्ताव आता केंद्र सरकारकडे पाठवला जाणार आहे.
- **हुरुन इंडिया फिलान्थ्रॉपी लिस्ट 2024:** नोव्हेंबर 2024 मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या 2024 EdelGive Hurun India Philanthropy List R 2153 कोटी रुपयांच्या देणग्यांसह एचसीएल टेकचे शिव नादर अव्वल स्थानावर आहेत. त्यानंतर अझीम प्रेमजी, मुकेश अंबानी, कुमार मंगलम बिर्ला आणि अनिल अगरवाल यांचा क्रमांक लागतो.
- **भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा 2024:**
  - 43वा भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा (India International Trade Fair: IITF) 14 ते 27 नोव्हेंबर या कालावधीत प्रगती मैदान, दिल्ली येथे आयोजित करण्यात आला.
  - संकल्पना: Vocal for Local, Local to Global.
  - राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे पॅव्हेलियन्स श्रेणीमध्ये पुद्दुचेरीने सुवर्णपदक, मेघालयने रौप्य पदक आणि कर्नाटकने कांस्य पदक जिंकले.

## रोहित बल

- प्रसिद्ध फॅशन डिझायनर रोहित बल यांचे नोव्हेंबर 2024 मध्ये आजारपणामुळे निधन झाले. ते 63 वर्षांचे होते.
- रोहित यांचा जन्म 8 मे 1961 साली श्रीनगरमध्ये झाला.
- त्यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीमधून फॅशन डिझायनिंगचा कोर्स केला होता.